# राज्याच्या आरोग्य विभागात होणार मेगा भरती

**मुंबई :** गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या आरोग्य विभागाची भरती प्रक्रिया आता पुन्हा सुरू होणार आहे. तब्बल १० हजार ९४९ पदांची भरती यामध्ये केली जाणार आहे, अशी माहिती राज्याचे आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी दिली. तत्कालीन सरकारच्या काळात २०२१ साली आरोग्य विभागात राबवण्यात आलेल्या भरती प्रक्रियेवेळी पेपरफुटीचा घोटाळा झाला होता. त्यानंतर ही भरती प्रक्रिया थांबली होती. आता पुन्हा एकदा आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या पुढाकाराने आणि पाठपुराव्यानंतर आरोग्य विभागातील मेगा भरती प्रक्रिया सुरू होणार आहे. या भरती प्रक्रियेत 'क' आणि 'ड' संवर्गातील विविध ६० प्रकारची पदे मिळून एकूण १० हजार ९४९ पदांची केली जाणार आहे. ही संपूर्ण भरती प्रक्रिया टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमार्फत राबवली जाणार आहे, असे मंत्री सावंत यांनी सांगितले.

रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १६ ◆ अंक ४३
www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, २९ ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

एकपात्री, द्विपात्री अभिनय स्पर्धेचे बक्षीस वितरण/३

रायगड जिल्ह्यातील शिक्षक घेताहेत तंत्रज्ञानाचे धडे/५

चंद्रकांत कांबळे यांच्या हत्येच्या निषेधार्थ निदर्शने, जाळपोळ/७

## भाजप जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन, पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

# दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कर्तृत्व विधायक कार्यासाठी प्रेरणादायी

### मंत्री रवींद्र चव्हाण यांचे प्रतिपादन





(छाया : संकेत भोईर) अधिक छायाचित्रे पान ८ वर..

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एखादी गोष्ट करायची ठरवली, तर ती ते पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसत नाहीत. त्यांचे कर्तृत्व, मेहनत आणि जिद्द विधायक कार्याला प्रेरणा देणारी आहे, असे प्रतिपादन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी सोमवारी (दि. २८) येथे केले.

भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा कार्यालय पनवेल तालुक्यातील डेरवली येथे उभारण्यात येणार असून त्याचे भूमिपूजन तसेच पनवेल शहरातील रूपाली सिनेमागृहाजवळील नूतनीकरण केलेल्या मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. त्या वेळी ना. चव्हाण बोलत होते.

मंत्री रवींद्र चव्हाण म्हणाले की, कोकणाच्या प्रवेशद्वारावर भाजपचे जिल्हा कार्यालय असावे ही पक्षाची इच्छा होती. त्यानुसार जागेचा शोध सुरू असताना लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी जागा शोधण्याची गरज नाही, आम्ही आमची जागा विनाशुल्क देतो, असे सांगितले आणि ते तेवढ्यावर थांबले नाहीत तर ती कृती आज प्रत्यक्षात आली. लोकनेते रामशेठ ठाकूर दानशूर आहेत हे नव्याने सांगायची गरज नाही. त्याचा प्रत्यय संपूर्ण महाराष्ट्राला आहे. पनवेल महापालिकेच्या निवडणुकीत मी त्यांना जवळून पाहिले आहे. दिवसरात्र मेहनत करीत त्यांनी भाजपला महापालिकेवर एकहाती सत्ता मिळवून दिली. तरुणांना लाजवेल असे परिश्रम ते घेतात. त्यामुळे त्यांच्याकडून शिकण्यासारखे भरपूर आहे. एखादी गोष्ट ठरवली तर ती ते पूर्ण करणारच. त्यामुळे त्यांच्यापुढे आपण सर्व छोटे कार्यकर्ते आहोत. पुढे बोलताना त्यांनी २०२४मध्ये आपल्याला प्रचंड यश मिळवायचे आहे. त्यामुळे संघटनात्मक शत प्रतिशत आणि सशक्त भारत बनविण्यासाठी सज्ज राहूया, असे आवाहन केले.

प्रास्ताविकपर भाषणात उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सांगितले की, तत्कालीन राष्ट्रीय अध्यक्ष अमित शाह यांनी प्रत्येक जिल्ह्यात सुसज्ज कार्यालय असावे, असा मानस व्यक्त केला होता. (पान २ वर..)

### पक्ष मजबुतीसाठी सतत कार्यरत राहूया –लोकनेते रामशेठ ठाकूर

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अध्यक्षीय भाषणात म्हटले की, उत्तर रायगड जिल्हा चार तालुके, महापालिका असा आणि मोठी लोकसंख्या असलेला जिल्हा आहे. या ठिकाणी देशभरातून नागरिक वास्तव्यास असून सर्व देशाचे लक्ष या भागात आहे. येथे आलेला प्रत्येक व्यक्ती आपला झाला आहे. त्यामुळे सबका साथ सबका विकास या अनुषंगाने प्रत्येक व्यक्तीचा विकास झाला पाहिजे. त्याकरिता जिल्हा कार्यालयाची गरज होती. ती या निमित्ताने पूर्ण होत असून आपल्याकडे आलेल्या प्रत्येकाला हे कार्यालय उपयुक्त ठरणार आहे. आपला पक्ष जगातील सर्वांत मोठा पक्ष आहे. उत्तर रायगड जिल्हा भाजपचा बालेकिल्ला होण्यासाठी आणि पक्ष मजबुतीसाठी सतत कार्यरत राहूया, असेही त्यांनी नमूद केले.

## दहावी, बारावीच्या परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर

**पुणे : प्रतिनिधी**




राज्य मंडळातर्फे दहावी, बारावीच्या फेब्रुवारी–मार्चमध्ये होणाऱ्या अंतिम परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले. त्यानुसार बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा १ ते २२ मार्च या कालावधीत होणार आहे.

राज्य मंडळाच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली. दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांचा परीक्षेचा ताण कमी करण्यासाठी संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले. सविस्तर वेळापत्रक http://www.mahasscboard.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वेळापत्रकाबाबत काही हरकती–सूचना असल्यास त्या १५ दिवसांत विभागीय मंडळ, राज्य मंडळाकडे लेखी स्वरूपात सादर करता येतील.

दहावी आणि बारावीच्या परीक्षा प्रचलित पद्धतीनेच होणार आहे. मंडळाच्या वेळापत्रकाची सुविधा ही माहितीसाठीच आहे. परीक्षेपूर्वी शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांकडे देण्यात येणारे छापील वेळापत्रक अंतिम असेल. प्रात्यक्षिक, तोंडी, श्रेणी परीक्षांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

## सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप भाडे व अनामत रक्कम पूर्णतः माफ करा

### आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिका हद्दीतील सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप भाडे व अनामत रक्कम पूर्णतः माफ करण्यात यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे. या संदर्भात त्यांनी आयुक्तांना निवेदन दिले आहे.

या निवेदनात आमदार प्रशांत ठाकूर यांनी म्हटले आहे की, गणेशोत्सव २२ दिवसांवर आला असताना सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची विविध परवानग्यांसाठी धावपळ सुरू आहे. गणेशोत्सव मंडळांना दिलासा मिळावा या दृष्टिकोनातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप भाडे व अनामत रक्कम आकारण्यात येऊ नये, असा निर्णय घेण्यात आला आहे. (पान २ वर..)

## निवडक

### जागतिक चॅम्पियनशिपमध्ये नीरज चोप्राला सुवर्णपदक

**बुडापेस्ट :** भारताचा स्टार भालाफेकपटू



नीरज चोप्रा याने जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपमध्ये सुवर्णपदक जिंकून पुन्हा एकदा देशाचे नाव उंचावले आहे. अंतिम फेरीत ८८.१७ मीटर भालाफेक करीत नीरज जागतिक स्पर्धेत सुवर्णपदकावर नाव कोरणारा आजवरचा पहिलाच भारतीय ॲथलिट ठरला आहे. या ऐतिहासिक विजयानंतर देशभरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

### गणेश चतुर्थीला जिओ एअर फायबर होणार लाँच

**मुंबई :** गणेश चतुर्थीला म्हणजेच १९ सप्टेंबर रोजी जिओ एअर फायबर लॉन्च होणार आहे. रिलायन्स इंडस्ट्रीजचे अध्यक्ष मुकेश अंबानी यांनी कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत याची घोषणा केली. जिओ एअर फायबर ५जी नेटवर्क आणि अत्याधुनिक वायरलेस तंत्रज्ञान वापरून घरे आणि कार्यालयांना वायरलेस ब्रॉडबँड सेवा प्रदान केली जाणार आहे.

## गतिमंद मुलांनी बनविलेल्या राख्या जवानांसाठी रवाना

### पेणच्या आई डे केअर केंद्रात निर्मिती



(छाया : इजाज मनियार)

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील आई डे केअर व्यवसाय प्रशिक्षण केंद्रातील गतिमंद विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या १५०० राख्या विविध सामाजिक सेवाभावी संस्थांनी सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांसाठी पाठविल्या आहेत. यामध्ये जन शिक्षण संस्थान अलिबाग, इनरव्हील क्लब ऑफ पनवेल यांसारख्या संस्था, शाळांचे मोलाचे सहकार्य लाभले, अशी माहिती आई डे केअर संस्थेच्या स्वाती मोहिते यांनी दिली.

देशाचे अहोरात्र रक्षण करणाऱ्या जवानांसाठी गतिमंद विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी राख्या तयार केल्या आहेत. या राख्या तयार करताना आनंद वाटत होता, असे या विद्यार्थ्यांनी सांगितले. या वर्षी २८ मुला–मुलींनी मिळून तब्बल पाच हजार राख्या बनविण्याचे काम हाती घेतले आहे.

सध्या हे विद्यार्थी दररोज सातशे राख्या बनतात. त्यातील १५०० राख्या विविध संस्थांच्या माध्यमातून जवानांना पाठविण्यात आल्या आहेत. त्यातून विद्यार्थ्यांना रोजगार मिळाला. विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने यंदा जादा राख्या बनविण्यात आल्याचे स्वाती मोहिते यांनी सांगितले.

## पनवेलमध्ये आज दिव्यांगांच्या दारी अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानांतर्गत मंगळवारी (दि. २९) पनवेल येथील विरूपाक्ष मंगल कार्यालयात सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून दिव्यांग अभियानाचे मुख्य मार्गदर्शक आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू या वेळी उपस्थित राहणार आहेत.

राज्य शासनाने दिव्यांग कल्याण व पुनर्वसनाच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वतंत्र दिव्यांग कल्याण मंत्रालयाची निर्मिती केलेली आहे. दिव्यांग कल्याण विभागाच्या आदेशान्वये दिव्यांगांच्या दारी हे अभियान राज्यातील सर्व महसूल विभागांतील प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार रायगडात अभियानानिमित्त पनवेल येथे मेळावा होत आहे. या मेळाव्यात सुमारे एक हजार दिव्यांग लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ देण्याचे नियोजन असून दिव्यांग बांधवांना उपयुक्त साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

## श्रीवर्धनमध्ये सलग दुसऱ्या दिवशी आढळली अमली पदार्थाची पाकिटे

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



(छाया : भरत चोगले)

श्रीवर्धन येथील जीवना समुद्री परिसरात अमली पदार्थाची पाकिटे आढळून आल्याची घटना ताजी असतानाच दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या हरिहरेश्वर समुद्रकिनारीही सोमवारी (दि. २८) अशीच पाकिटे आढळून आली आहेत. यामध्ये चरस असून पाकिटांवर अफगाणिस्तानचा उल्लेख आहे.

हरिहरेश्वर येथील सागरी सुरक्षा सदस्य रूपेश मयेकर सोमवारी सकाळी समुद्रकिनाऱ्यावर फिरत असताना त्याला ही अज्ञात पाकिटे आढळून आली. याबाबतची माहिती त्याने श्रीवर्धन पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे व उपविभागीय अधिकारी प्रशांत स्वामी पथकासह तेथे दाखल झाले. ही अमली पदार्थाची पाकिटे समुद्राच्या पाण्याबरोबर किनाऱ्यालगत वाहून आल्याचे दिसून आले. सुरुवातीला त्यांना सात ते आठ पाकिटे आढळून आली. त्यानंतर पोलीस अधिकाऱ्यांनी संपूर्ण यंत्रणेला पाचारण केले असता कसून गस्त घातली असता संध्याकाळपर्यंत २९ पाकिटे मिळून आली.

काही दिवसांपूर्वी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली समुद्रकिनाऱ्याच्या परिसरातदेखील अशाच प्रकारे अमली पदार्थांची पाकिटे आढळली होती. आता ही पाकिटे रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धनमधील किनाऱ्यांवर आढळत आहेत. नागरिकांनी अशी पाकिटे आढळल्यास ती दडवून न ठेवता याबाबत माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

## श्रावणसरी ठरताहेत भातशेतीस पोषक

### बळीराजाला दिलासा



(छाया : जयवंत माडपे)

**खोपोली : प्रतिनिधी**

गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून दडी मारलेल्या पावसाचे पुनरागमन झाले असून गेले काही दिवस तो अधूनमधून हजेरी लावत आहे. भातशेतीवर रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असताना बसरत असलेल्या श्रावणसरींनी बळीराजाला दिलासा दिला आहे.

जून महिन्यात उशिरा पाऊस आल्याने या वर्षी दुबार पेरणीची वेळ येते की काय अशी स्थिती निर्माण झाली होती, परंतु जुलै महिन्यात विशेषतः पंधरवड्यात दमदार पाऊस पडला. त्यानंतर पावसाने पुन्हा दडी मारली. त्यामुळे शेतीवर रोगराई पसरण्याची शक्यता निर्माण झाली होती. अखेर ऑगस्ट महिन्यात वरुणराजाचे पुनरागमन झाले. श्रावण महिन्यातील या पावसाला हवा तसा जोर नसला तरी अधूनमधून सरी येत असून त्यातून शेतीला जीवदान मिळाले आहे. योग्य वेळी झालेल्या पावसाने भातशेती बहरत असल्याने सर्वांत जास्त समाधान शेतकरीवर्गात आहे.

खोपोली–खालापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिक क्षेत्र असले तरी दीड हजार हेक्टरच्या वर क्षेत्रात भात लागवड करण्यात येते. यातील अनेक शेतकरी प्रयोगशील असून खोपोली व कर्जत कृषी संशोधन केंद्राच्या मार्गदर्शनाने दरवर्षी नवनवीन जातीचे भाताचे वाण लागवडीसाठी वापरून उत्पादन वाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. यासाठी तालुका कृषी विभागही सक्रिय आहे. नैसर्गिक संकट न आल्यास या वर्षी भातशेतीचे चांगले उत्पादन होणे अपेक्षित आहे, असे शेतकरी दत्तात्रय दिसले यांनी सांगितले.

## बाईपण भारी देवा | पनवेलमध्ये रंगली मंगळागौर






(छाया : प्रफुल्ल कांबळे)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने मंगळागौरी २०२३चे आयोजन रविवारी (दि. २७) गणपती मंदिरातील हॉलमध्ये करण्यात आले होते. या वेळी नाच गं घुमा मंडळाच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाले. त्यास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यामध्ये खेळू झिम्मा फुगडी, विणू गोफ संस्कृतीचा! आनंद घेऊ सख्यांनो, नाच गं घुमाच्या साथीचा!! या शीर्षकाखाली कार्यक्रम रंगले. या वेळी गाणी, फुगड्या, नाच यांसह विविध कला सादर करून तरुणींसह वृद्ध महिलांनी खेळ खेळून मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमाला शकुंतला रामशेठ ठाकूर, वर्षा प्रशांत ठाकूर आणि अर्चना परेश ठाकूर यांनी भेट देत सहभाग घेतला.

कार्यक्रमास माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, आयोजक मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजारराव, मुक्ता गुप्ते, नीता झुंजारराव, स्वाती कोळी, जागृती झुंजारराव, ज्योती झुंजारराव, रूचिता ठाकूर, पल्लवी झुंजारराव, गौरी देशमुख, मैत्री मोरबाळे, किर्ती देशमुख, नूतन पाटील यांच्यासह पदाधिकारी आणि परिसरातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# राज्यातील दुष्काळग्रस्त भागांना पाणी पुरविणाऱ्या प्रकल्पांना मदत मिळावी

## पश्चिम क्षेत्रिय परिषदेच्या बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची मागणी

**गांधीनगर : वृत्तसंस्था**

दुष्काळग्रस्त मराठवाड्यात पाण्याची समस्या आहे. नदी जोड प्रकल्प प्रकल्प, मराठवाडा वॉटर ग्रीड आणि कोकणातून समुद्रात वाहून जाणारे पाणी याचा योग्य तो वापर यासाठी करण्यास केंद्राकडून मदत हवी आहे. त्याचप्रमाणे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले आहे. ते सोमवारी (दि. २८) अहमदाबाद येथील गांधीनगर येथे पश्चिम क्षेत्रीय परिषदेच्या २६व्या बैठकीत बोलत होते.

बैठकीच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय गृह आणि सहकारमंत्री अमित शाह होते. बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच गुजरात आणि गोव्याचे मुख्यमंत्री आणि दादरा व नगर हवेली, दमण आणि दिव या केंद्रशासित राज्याचे प्रशासक, राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिकदेखील उपस्थित होते. तिलारी सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी गोवा राज्यासोबत समन्वयाने काम करीत असून गोव्याच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठकही झाल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

नाफेडने कांदा खरेदी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांचे अभिनंदन केले. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, अशी अनेक वर्षांपासूनची मागणी प्रलंबित आहे. याबाबतीत केंद्राने लवकरात लवकर निर्णय घ्यावा, असेही मुख्यमंत्री म्हणाले. राज्य शासन डहाणू ते सिंधुदुर्गपर्यंत पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी कोस्टल रोड तयार करीत आहे. गोवा आणि गुजरात या राज्यांशी, जर हा मार्ग जोडला गेला, तर निश्चितच या राज्यात पर्यटन मोठ्या प्रमाणावर वाढेल, असा विश्वासही मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. या वेळी प्रामुख्याने मुख्यमंत्र्यांनी गेल्या वर्षभरात राज्य शासनाद्वारे चालविल्या जाणाऱ्या उपक्रम आणि कार्यक्रमांची माहितीही दिली.

महिलांवरील अत्याचारांसंदर्भात राज्य शासन गंभीर असून लैंगिक गुन्हे, महिला आणि मुलांवरील बलात्काराच्या प्रकरणांचा तपास जलदगतीने सुरू आहे. लैंगिक गुन्ह्यांसाठी तपास ट्रॅकिंग सिस्टिमच्या अनुपालन दरामध्ये लक्षणीय सुधारणा झाली आहे. बलात्कार आणि पोक्सो कायद्यातील खटल्यांवर जलद कारवाईसाठी १३८ फास्ट ट्रॅक स्पेशल कोर्ट स्थापन करण्यात आली आहेत, असे ते म्हणाले.

शेतकऱ्यांसाठी पीक विमा योजना केवळ एक रुपयात राबविण्यात येत आहे तसेच नमो किसान महासन्मान योजनेंतर्गत राज्यातून शेतकऱ्यांना दरवर्षी सहा हजार रुपये देण्यात येत आहेत याची माहितीही त्यांनी दिली.




### परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र आघाडीवर

आज महाराष्ट्र हे परकीय गुंतवणुकीत देशातील आघाडीचे राज्य बनले आहे. दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममधील सामंजस्य कराराची ७५ टक्के अंमलबजावणीदेखील झाली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जपानहून महाराष्ट्रात गुंतवणूकीसाठी सकारात्मक चर्चा केली आहे, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नवीन बंदरे धोरण, माहिती तंत्रज्ञान धोरण, वस्त्रोद्योग धोरण आणि हरित हायड्रोजन धोरणाच्या माध्यमातून महाराष्ट्राला आघाडीवर नेण्यात येत आहे. सीझेडएमपीची मान्यता मिळाल्यामुळे राज्यातील पाच किनारी जिल्ह्यांमध्ये पर्यटनाला चालना मिळेल, असेही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# मुंबई–गोवा महामार्ग पूर्ण होण्यासाठी नागरिकांचे सहकार्य हवे

## सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांचे आवाहन

**चौक : प्रतिनिधी**

कोकण विकास समितीच्या माध्यमातून मुंबई–गोवा रस्त्याच्या दुरवस्थेसंबंधी खुले चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या वेळी त्यांनी मुंबई–गोवा महामार्गाचे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी नागरिकांचेही सहकार्य हवे, असे आवाहन सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी केले.



मुंबई –गोवा महामार्गासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून आतापर्यंत चार हजार ५०० कोटींचा निधी वितरित केला आहे. याबाबत कोकण विकास समिती यांच्या वतीने डोंबिवली येथे खुले चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या वेळी रायगड, रत्नागिरी व सिंधदुर्ग जिल्हयातील अनेक नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनेक वर्षांपासून रखडलेला मुंबई–गोवा महामार्ग येत्या डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण करणार असे सांगून या कामाची एक मार्गिका कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या भक्तांसाठी खुली करण्याचा निर्धार मंत्री रवींद्र चव्हाण यांनी केला आहे. आपण स्वतः दर आठवड्याला या कामाची प्रत्यक्ष पाहाणी करीत असल्याचे सांगितले. कोकण विभागातून आलेल्या नागरिकांनी अनेक प्रश्न उपस्थित केले. त्या प्रश्नांना मंत्री रवींद्र चव्हाण यांनी भाषणातून उत्तरे दिली.

हा रस्ते प्रकल्प का रखडला, याविषयी चर्चा करण्याऐवजी आता कोकणातील मंडळींनी सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे. संघटितपणे हा महत्त्वपूर्ण रस्ता पूर्ण होण्यासाठी शासनाला साथ दिली तर हा रस्ता दिलेल्या मुदतीत पूर्ण होईल. यापूर्वी हा महामार्ग का, कोणी, कसा रखडवला हे सर्व कोकणवासीयांना माहिती आहे. या विषयात न जाता आता हा रस्ता पूर्ण करण्याचा निर्धार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार यांनी केला आहे. या तिन्ही मंत्र्यांकडून दररोज या रस्ते कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला जात आहे.

कोकणचा एक रहिवासी म्हणून मला वैभवशाली कोकणाविषयी तळमळ आहे. शासनाकडून मंत्री म्हणून मला अधिकार मिळाले आहेत. त्याचा पुरेपूर लाभ उठवून मी कोकणवासीयांच्या सर्वांगीण हिताचा विचार करून हा रस्ता पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. आता कोणी या रस्ते कामात अडथळा आणला, आडवे येण्याचा प्रयत्न केला तर त्याची गय केली जाणार नाही, असा इशारा मंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिला.

कोकणासाठी वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याचा विचार शासन करत आहे, असे चव्हाण म्हणाले. या वेळी कोकण विकास समिती अध्यक्ष जयवंतराव दरेकर, समितीचे पदाधिकारी, तिन्ही जिल्ह्यातील कार्यकर्ते यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

# खिडूकपाडा येथून गुटखा, तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली पोलिसांनी खिडूकपाडा भागातील एका घरावर छापा मारून गुटखा व इतर तंबाखूजन्य पदार्थांचा साठा जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी गुटख्याचा साठा बाळगणाऱ्या व्यक्तीला अटक केली आहे.

खिडूकपाडा येथील नाथा चांगो भोईर निवासमधील किराणा स्टोअरच्या वरच्या मजल्यावर राहणाऱ्या व्यक्तीने आपल्या घरात मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा विक्रीस आणून ठेवल्याची माहिती कळंबोली पोलिसांना मिळाली होती. या आधारे सहाय्यक पोलीस निरीक्षक अजय चव्हाण व त्यांच्या पथकाने कळंबोलीतील खिडूकपाडा गावातील संशयित घरावर छापा मारलात्यानंतर कळंबोली पोलिसांनी या घरात असलेल्या भोगिंदर विश्वनाथ शहा (वय ३४) याला ताब्यात घेऊन घरातील पांढऱ्या रंगाच्या गोण्यांची तपासणी केली.

या वेळी दोन लाख ११ हजार रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाल्याचा साठा आढळला. या वेळी पोलिसांनी भोगिंदर शहाकडे गुटखा व पानमसाल्याबाबत चौकशी केली. तेव्हा त्याने याची काहीही माहिती दिली नाही. नंतर पोलिसांनी भोगिंदर शहाविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात अन्नसुरक्षा आणि मानके अधिनियमानुसार गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी व्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात सोमवारी (दि. २८) कौशल्य विकास समितीतर्फे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी 'मॅनर्स व इंडिकेट्स' यावर व्याख्यानाचे आयोजन केले होते.



या व्याख्यानाचा प्रमुख उद्देश महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना महाविद्यालयामध्ये काम करीत असताना, शिक्षकांसोबत, विद्यार्थ्यांसोबत, पालकांसोबत कशा पद्धतीने वागले पाहिजे याविषयी समजावे हा होता. व्याख्यानासाठी प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी वक्ते म्हणून उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना मॅनर्स व इंडिकेट्स काय असतात व त्यांचे उपयोजन महाविद्यालयामध्ये काम करताना कसे करावे याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. या व्याख्यानाचे आयोजन प्रा. रूपाली नागरेकर (समन्वयक, कौशल्य विकास समिती) यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश ठाकूर व प्रा. डॉ. धनवी आवटे यांनी सहकार्य केले.

# पनवेलमधील राष्ट्रवादी, मनसे पदाधिकाऱ्यांचा शिवसेनेत प्रवेश





**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यशैलीने प्रभावित होऊन पनवेलचे महानगर प्रमुख माजी नगरसेवक ॲड. प्रथमेश सोमण यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीचे माजी शहराध्यक्ष महेश सावंत तथा मनसे वाहतूक सेनेचे पनवेल शहराध्यक्ष सिद्धेश खानविलकर यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे माजी शहराध्यक्ष राहिलेले महेश सावंत यांनी यापूर्वी निवडणूक लढवून भरघोस मते घेतली आहेत. पनवेलमध्ये त्यांचा मित्रपरिवार ही मोठा आहे, तर अनेक वर्ष मनसेची संलग्न असलेले सिद्धेश खानविलकर यांनी देखील आता शिवसेनेत सक्रिय काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

या दोघांनीही मुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत वर्षा निवासस्थान येथे जाहीर पक्षप्रवेश केला व त्यानंतर खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांचीही पनवेलमध्ये भेट घेतली. या वेळी खासदार बारणे यांनीही त्यांचे शिवसेनेत स्वागत केले. लवकरच पनवेल महानगर व शहर पातळीवर योग्य ते पद देऊन त्यांना जबाबदारी दिली जाईल, असे प्रथमेश सोमण यांनी सांगितले.

# चिरनेरमध्ये कृषी अधिकाऱ्यांचा शेतकऱ्यांशी संवाद

**उरण : वार्ताहर**

शेतकऱ्यांनी भातशेती, आंबा, भाजीपाला उत्पादनाबरोबरच पशुपालन करून त्याचे संगोपन करावे, देशी गाई पाळाव्यात आणि त्यातून मिळणाऱ्या चांगल्या प्रतीच्या दुधाचा ब्रँड तयार करावा की, ज्यामुळे आपले आर्थिक उत्पन्न वाढण्याला मदत होईल, असे प्रतिपादन पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. गुणवंत पाटील यांनी केले.

चिरनेर ग्रामपंचायतीच्या सभागृहात शेतकरी व पशुपालकांची सभा घेण्यात आली होती. या वेळी पशुसंवर्धन सहाय्यक आयुक्त डॉ. गुणवंत पाटील आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. या वेळी व्यासपीठावर सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ. संतोष डाबेराव पशुधन पर्यवेक्षक डॉ. महेश शिंदे, कृषीमित्र प्रफुल्ल खारपाटील, पोलीस पाटील संजय पाटील तसेच कृषी खात्याचे अधिकारी व शेतकरी उपस्थित होते. त्यांनी पशुपालकांना राष्ट्रीय पशुधन, अभियान अंतर्गत कुक्कुटपालन, शेळीपालन, वराहपालन, पशुखाद्य व चारा निर्मिती योजना याविषयी सविस्तर माहिती दिली.

उरणचे पशुधन विकास अधिकारी डॉ. सोमनाथ भोजने यांनी पशुपालकांना राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण योजना, वैरण विकास योजना, किसान क्रेडिट कार्ड योजना कुक्कुट पिल्ले वाटप योजनांविषयी उपयुक्त माहिती दिली.




**MAHATRANSCO** Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | **Tender No. & Name of Tender** | **RFx No. 7000028395** **Tender No.:** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-42/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of Vehicle at 220kV GIS Ulwe & attached Waghivali Substation under EHV (O&M) Division, Panvel for Period 01.08.2023 to 31.03.2024. **Tender Amount** Limited to Rs. 3,24,914/- **EMD Amount:** Rs. 5,000/- |
| 2 | **Online Downloading of the RFx** | 29.08.2023, 18:00 Hrs to 05.09.2023, 23:59 Hrs. |
| 3 | **Online Submission of the RFx** | On or Before 05.09.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | **Online Opening of the Techno-Commercial RFx** | 06.09.2023 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल १) डॉ. महेश दामोदर वाघमारे २) सौ. प्रांजली महेश वाघमारे रा. कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी खालील प्रमाणे वर्णन केलेली मिळकत जमीन १) श्री. हेमंत कुमार शंकर नवरंगे २) सौ. कांचन अनिल तेरेदेसाई ३) सौ. स्नेहा संजय कुलकर्णी, रा. देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड यांजकडून सदर मिळकत विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**मिळकतीचे वर्णन:**
**मौजे देहरंग, ता. पनवेल, जि. रायगड**

| स.नं. | हि.नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.चौ.से.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १ | ग/४० | ०–०८–६० | ८६.०० |

तरी सदरहू मिळकतीवर वा कोणत्याही भागावर गहाण, दान, बक्षिस, फरोक्त वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, वा तत्सम कोणतेही दावे मालकी वा अन्य हक्क हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी वा संबधीतांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून आमचे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील, याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी. व सदर मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

पनवेल,
दिनांक: २८/०८/२०२३

**सही/–**
**निलेश द. हातमोडे**
ॲडव्होकेट

पत्ता:– शॉप नं १३०, मुन्सीपल शॉपींग कॉम्प्लेक्स, पहीला मजला, भाजी मार्केटजवळ, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६. मो. नं. ८१०८५५८२८९


**पान १ वरुन**

# भाजप जिल्हा कार्यालयाचे भूमिपूजन, पनवेल मध्यवर्ती कार्यालयाचे उद्घाटन

त्यानुसार उत्तर रायगड जिल्हा कार्यालयासाठी जागा शोधत असताना लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर यांनी कोणताही विचार न करता डेरवली येथील २४.३ गुंठे जागा दिली. एवढेच नाही, तर त्या जागेचे दानपत्र करून पक्षाच्या नावावर ही जागा केली. हे काम फक्त लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेबच करू शकतात, असेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

या कार्यक्रमास कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, उपाध्यक्ष अतुल काळसेकर, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, सी. सी. भगत, जिल्हा संघटन सरचिटणीस नितीन पाटील, दीपक बेहेरे, पनवेल तालुका मंडल अध्यक्ष अरुणशेठ भगत, सरचिटणीस राजेंद्र पाटील, शहर मंडल अध्यक्ष जयंत पगडे, उरण मंडल अध्यक्ष रवी भोईर, खालापूर मंडल अध्यक्ष रामदास ठोंबरे, खोपोली मंडल अध्यक्ष रमेश रेटरेकर, कामोठे मंडल अध्यक्ष रवींद्र जोशी, खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक गणेश मंडळांना मंडप भाडे व अनामत रक्कम पूर्णतः माफ करा

त्याचप्रमाणे याची अंमलबजावणी म्हणून ठाणे महानगरपालिका आयुक्त यांनी हा निर्णय घेऊन संबंधित अधिकाऱ्यांना या संदर्भात निर्दे श दिले असल्याचे समजते. याच धर्तीवर पनवेल महानगरपालिका हद्दीतील परवानगीसाठी येणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मंडप भाडे व अनामत रक्कम पूर्णः माफ करण्यात यावे, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे केली आहे.

# कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयात रोजगारविषयक कार्यशाळा उत्साहात

**उरण : रामप्रहर वृत्त**

उरण महाविद्यालयामध्ये करिअर गायडन्स सेल आणि अर्थशास्त्र विभाग तसेच जिओ डिजिटल लाईफ योजनाच्या अंतर्गत महाविद्यालयामध्ये कमवा आणि शिका या योजनेच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी आणि त्यांची उपलब्धता याविषयी कार्यशाळा घेण्यात आली.




या वेळी जिओ डिजिटल लाईफ ५जी प्रोग्राम आणि प्रोजेक्टमधील संधीची चर्चा करण्यात आली. डिजिटल मार्केटिंगविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमामध्ये जिओ डिजिटल लाईफ यांचे कंज़ूमर सपोर्ट डायरेक्टर सौरभ कुमार यांनी विद्यार्थ्यांना ५जी संदर्भात माहिती दिली. त्यानंतर अमरदीप सिंग यांनी विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे कार्य करावे याविषयी माहिती दिली. अंकित मेहता यांनी समस्या आणि त्यावरील उपाय यासंदर्भात चर्चा केली. त्याचप्रमाणे योगेश बेलाने यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन केले. प्राचार्य डॉ. बळीराम गायकवाड यांनी, महाविद्यालयाने केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. यानंतर अकाउंटन्सी विभाग प्रमुख प्रो. श्यामा यांनी विद्यार्थ्यांनी कमवा आणि शिका योजनेबाबत मार्गदर्शन केले. आयक्यूएसी कॉर्डिनेटर डॉ. ए. आर. चव्हाण, ज्येष्ठ प्राध्यापक व्ही. एस. इंदुलकर, प्रा. थवरे, डॉ.हिंगमिरे, डॉ. लोने, प्र. ए. के. गायकवाड, प्रा. कांबळे मॅडम, कार्यालय अधीक्षक टी. एन. घ्यार या वेळी उपस्थित होते.

# सुसज्ज कार्यालयामुळे नागरिकांना सुलभ सेवा मिळेल -ना. चव्हाण

## विभागीय, उपविभागीय कार्यालयीन इमारतीचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पनवेल विभागीय आणि उपविभागीय कार्यालय पनवेल क्रमांक १ व २ या प्रस्तावित कार्यालयीन इमारतीचे भूमिपूजन राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सोमवारी (दि. २८) पनवेल भिंगारी येथे झाले.

या वेळी मंत्रीमहोदयांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपस्थित अधिकाऱ्यांशी आणि कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

या कार्यक्रमास आमदार प्रशांत ठाकूर, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग कोकण मुख्य अभियंता शरद राजभोज, रायगड अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड, अधीक्षक अभियंता रूपाली पाटील, कार्यकारी अभियंता अलिबाग जगदीश सुखदेवे तसेच संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाची विभागीय कार्यालये ही चांगली व सुसज्ज असली पाहिजेत. यामुळे कार्यालयीन अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांचा कार्यक्षमतेमध्ये नक्कीच वाढ होईल तसेच येथे राहणाऱ्या स्थानिक नागरिकांना या सुसज्ज व चांगल्या कार्यालयाचा नक्कीच फायदा होईल व सुलभ शासकीय सेवा मिळू शकेल, असे मंत्री रवींद्र चव्हाण या वेळी म्हणाले.

सार्वजनिक विभागाची सर्वच विभागीय कार्यालये अशाच पद्धतीने सुसज्ज व उत्तम आणि दर्जेदार करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी सांगितले.

# कराडे बुद्रुक येथील शेकाप कार्यकर्ते भाजपमध्ये

## आमदार महेश बालदी यांनी केले स्वागत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपची विचारसरणी, विकासकामांचा धडाका व आमदार महेश बालदी यांच्या कार्यप्रणालीला प्रभावित होत कराडे बुद्रुक येथील शेकापच्या कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये आपटा येथे झालेल्या कार्यक्रमात रविवारी (दि. २७) जाहीर प्रवेश केला. या सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार महेश बालदी यांनी पक्षाची शाल देऊन स्वागत केले.

या वेळी माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष विद्याधर जोशी, केळवणे जि. प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, आपटाचे सरपंच नजनिन पटेल, माजी सरपंच दत्ता पाटील, कराडे खुर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे, ताराचे उद्योगपती बाळूशेठ पाटील, भाजप नेते गणेश पाटील, साईचे माजी सरपंच विद्याधर मोकल, शिरढोणचे माजी उपसरपंच जगदीश चौधरी, ग्रामपंचायत सदस्य असद पिटू, संतोष शिंगाडे, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत, कृष्णा वाघे, दत्ता भोईर, सुशील ठाकूर, धर्मेंद्र भोईर, विलास ठाकूर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कराडे बुद्रुक येथील शेकापचे मंगेश आवळे, प्रतिक पाटील, निकेश मालुसरे, निसर्ग पाटील, मयूर मालुसरे, प्रल्हाद पवार, आकाश साळवी, सुरज वाघ, यश वाघ, स्वस्तिक भोजने, सुजल पेळणेकर, दर्शन गोडवाले, चेतन गोडवाले, कुणाल गोडवाले, रितेश बोंबले, विशाल शिर्के, शुभम साळवी, मयूर झिंगरे, कुणाल झिंगरे, समर उकेरे, शुभम साळवी, रोहित कुडाळने, सोहम झिंगरे, जयश शिर्के, दीपक शिर्के, प्रवीण पाटील, नंदू महाडिक यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.





**पनवेल : परिणीता सोशल फाउंडेशनच्या वतीने रक्षाबंधन स्पेशल वस्तूंचे प्रदर्शन शहरातील गोखले हॉलमध्ये भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचे उद्घाटन द्रोणागिरी नोड येथील भागुबाई चांगू ठाकूर महाविद्यालयाच्या कार्यकारिणी सदस्य अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते सोमवारी झाले. या वेळी डिस्ट्रिक्टर लायन्स क्लबचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मुकेश तरनेजा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, श्री सद्‌गुरू कॉटर्सचे मालक सुयोग पेंडसे आदी उपस्थित होते.**

# करंजाडे सेक्टर ६मधील पाणीप्रश्न लवकरच मार्गी

## सरपंच मंगेश शेलार यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे सेक्टर ६मधील पाणीप्रश्न लवकरच मार्गी निघणार असून सरपंच मंगेश शेलार यांच्या हस्ते नवीन पाण्याच्या कनेक्शच्या कामाचा शुभारंभ सोमवारी (दि. २८) करण्यात आला.

करंजाडे सेक्टर ६मधील नागरिकांना पाण्याची समस्या अनेक दिवसांपासून भेडसावत होती. यासाठी आमदार महेश बालदी, सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, शहर अध्यक्ष मिरेंद्र शहारे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी सातत्याने पाठपुरावा करीत होते. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले असून आमदार महेश बालदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सरपंच मंगेश शेलार यांच्या हस्ते नवीन पाण्याच्या कनेक्शच्या कामाचे शुभारंभ करण्यात आला.

या वेळी भाजप विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, तालुका उपाध्यक्ष बळीराम म्हात्रे, उपाध्यक्ष नाथाभाई भरवाड, शहर सरचिटणीस सचिन कदम, बळीराम भोईर यांच्यासह पदधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. येथील नागरिकांनी भाजपचे आभार मानले.

# एकपात्री, द्विपात्री अभिनय स्पर्धेचे बक्षीस वितरण

## अनन्या पिंगळे, प्रचिती शिर्के-अक्षरा पाटील, प्रतिकेश मोरे, अभिराज भोसले-गार्गी घेगडमोल प्रथम





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपण जे काम करतो त्याची नोंद कुठेना कुठे तरी झालेली असते. त्यामुळे तुमच्या नाट्यक्षेत्रातील कामाची नोंद होईल आणि तुम्ही भावी काळात कलाकार व्हाल याची खात्री वाटते, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी एकपात्री, द्विपात्री अभिनय स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभावेळी केले. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते १०व्या अटल करंडक स्पर्धेच्या चषकाचे अनावरण आणि स्पर्धेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या.

कलाकारांच्या अभिनयाची कसोटी पाहण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा पुरस्कृत भाजप सांस्कृतिक सेल उत्तर रायगडच्या वतीने एकपात्री आणि द्विपात्री अभिनय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी (दि. २७) झाला. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात झालेल्या ही स्पर्धा खुला आणि शालेय या दोन गटात झाली. यामध्ये खुल्या गटातील एकपात्री अभियन स्पर्धेत प्रतिकेश मोरे प्रथम, उमेश वाळके द्वितीय, श्रद्धा सावंत तृतीय, राहुल तायडे आणि वैष्णव पाटील यांना उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला.

एकपात्री शालेय गटात अनन्या पिंगळे हीने प्रथम, कृपा गायकवाड द्वितीय, संस्कृती शिंदे तृतीय, ओवी मोघे आणि तनिष्का आपणकर यांना उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. द्विपात्री शालेय गटात प्रचिती शिर्के–अक्षरा पाटील यांनी प्रथम, कृपा गायकवाड–तेजस कुंभार यांनी द्वितीय, सिद्धी पार्टे–सृष्टी यादव यांनी तृतीय, दिपश्री न्हावकर–वैष्णवी शिंदे आणि देवांग पाटील–सिद्धर्थ सावंत यांना उत्तेजनार्थ बिक्षस देऊन गौरविण्यात आले. द्विपात्री खुल्या गटात अभिराज भोसले–गार्गी घेगडमोल प्रथम, अमिषा पवार–वैशाली सवने यांनी द्वितीय, अक्षता साळवी–प्रणाली बोराळे यांनी तृतीय तर प्रतिकेश मोरे–उमेश वाळके आणि ऋतुजा भगत–बालाजी माने यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला. या सर्व विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.

या स्पर्धेवेळी १०व्या अटल करंडक स्पर्धेच्या तारखा जाहीर झाल्या. त्यानुसार ही स्पर्धा ८, ९ आणि १० डिसेंबरला होणार असून पावनखिंड या सिनेमामध्ये नरवीर शिवा काशीदची भूमिका बजावणारे तसेच सीकेटी महाविद्यालयाचे माजी



विद्यार्थी अजिंक्य ननावरे हे यंदाच्या स्पर्धेचे ब्रँड अॅम्बेसिडर असणार आहेत.

या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, महापलिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, विलास कोठारी, विनोदी अभिनेता अंकित म्हात्रे, चला हवा येऊ द्या फेम संदीप रेडकर, शामनाथ पुंडे, सांस्कृतिक सेलचे अभिषेक पटवर्धन, गणेश जगताप, अमोल खैर, चिन्मय समेळ, वैभव बुवा, निखिल गोरे आदी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर विद्यालयात विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक उत्साहात

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात सोमवारी (दि. २८) शालेय विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक कार्यक्रम उत्साहात झाला.

लोकशाहीमध्ये मतदार महत्त्वाची भूमिका निभावतात. आजचे विद्यार्थी हे भविष्यातील सुजाण नागरिक असतात. त्यांना लोकशाही, निवडणूक प्रक्रिया, राजकीय पक्ष, जाहिरनामा, मंत्रिमंडळ, विरोधी पक्ष, राज्य कारभार, नागरिकांची कर्तव्यांची माहिती व्हावी या हेतूने विद्यालयात विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक घेण्यात आली. यामध्ये विद्यार्थ्यांमधून मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, पोलीस अधिकारी, शिपाई अशा पदावर विद्यार्थ्यांनी काम केले.

वर्गमंत्री या पदाकरिता मतदान घेण्यात आले व सर्व विद्यार्थ्यांसमक्ष मतमोजणी करण्यात आली तसेच क्रीडामंत्री, उपक्रममंत्री, स्वच्छतामंत्री व आरोग्यमंत्री



या पदाच्या निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीमध्ये इयत्ता आठवीमधून भूमि जोशी, नववीमधून सुवान शेख, तर दहावीमधून आदिती जोशी हे वर्गमंत्री म्हणून निवडून आले. निवडणूक उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रचार्य नायर यांच्या मार्गदर्शनाखाली झाला. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून प्रभारी मुख्याध्यापक खांदेकर यांनी काम पाहिले, तर सूक्ष्म निरीक्षक म्हणून राजिप शाळा ओवेपेठचे शिक्षक पाटील यांनी काम पाहिले. निवडणूक नियोजन जाधव, जोगदंडे व पवार यांनी केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष वाय.टी.देशमुख, संचालक आमदार प्रशांत ठाकूर साहेब, सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# पनवेलमध्ये मंगळागौर स्पर्धेला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**

मंदार काणे एंटरटेन्मेंट आणि फ्लॉसम एंटरटेन्मेंटर्फे वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे आयोजित केलेल्या मंगळागौर स्पर्धेला रसिकप्रेक्षकांचा हाऊसफुल्ल प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमासाठी लोकमान्य बँक पनवेल शाखेचे व्यवस्थापक अरविंद कुदळे, मयूर निजामपूरकर आणि पटेल ज्वेलर्सच्या प्रतीक्षा व्यास, त्याचसोबत विशेष सहकार्य म्हणून ओरायन मॉल पनवेल, आचार्य ९० फेम, प्रिशा साडीजच्या अर्चना खरात, संजय पोतदार, पु. ना. गाडगीळ ज्वेलर्स, भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी



नगरसेवक नितीन पाटील, भाजप महिला मोर्चाच्या पनवेल तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, प्रथमेश सोमण, गणेश पाटील, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुलोचना कल्याणकर, नीता माळी, सुहासिनी केकाणे, नाट्यगृह व्यवस्थापक राजेश डोंगरे, लतिका मंदार काणे, कल्पना माने यांच्यासह सर्व नाट्यगृह कर्मचारी, सर्व पत्रकार आणि उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून बिग बॉस मराठी फेम अभिनेत्री सोनाली पाटील यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमामध्ये नवदुर्गा ग्रुप दिवा ठाणे यांचा प्रथम क्रमांक, समृद्धी महिला ग्रुप ऐरोली यांचा द्वितीय क्रमांक आणि माउली ग्रुप ऐरोली यांचा तृतीय क्रमांक पटकावला. या सर्वांना अनुक्रमे पाच हजार, तीन हजार आणि दोन हजार रुपये त्याचसोबत ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले.

त्याचप्रमाणे तेजोमय ग्रुप पनवेल आणि सखी मंगळागौर ग्रुप पनवेल यांना उत्तेजनार्थ बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले. याचसोबत साक्षी पेडणेकर, मिताली नाटेकर, संजना महेंद्र गोंधळी, गौरी पत्की आणि कुमारी सुप्रिया पाटील या पाच जणींना वैयक्तिक बक्षिसे देण्यात आली या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हरेश मोकल यांनी केले.

## खारघरमध्ये सिमेंटचा बेंच अंगावर पडून लहानग्या मुलीचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

गार्डनमध्ये बसवण्यात आलेला सिमेंटचा बेंच अंगावर पडून एका चार वर्षीय मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना खारघरमध्ये घडली आहे. ब्रिजा विश्वकर्मा (वय ४, रा. खारघर सेक्टर १२) असे मृत मुलीचे नाव आहे.

ब्रिजा आपल्या वडिलांना घेऊन खारघरमधील एका गार्डनमध्ये गेली होती. या वेळी ब्रिजाचे वडील प्रकाश विश्वकर्मा हे गार्डनमधील एका सिमेंटच्या बाकड्यावर बसले, त्या वेळी ब्रिजा याच गार्डनमध्ये खेळत होती, खेळताना ब्रिजा ही गार्डनमधील सिमेंटच्या बाकड्यावर बसायला गेली. बाकड्यावर बसायचा प्रयत्न करीत असताना हा बाकडा खाली पडला आणि ब्रिजा बाकड्याच्या खाली अडकली.

हे पहिल्यानंतर वडील प्रकाश विश्वकर्मा धावत गेले आणि बाकडे बाजूला करण्याचा प्रयत्न केला. बाकडे बाजूला केल्यानंतर तिला दवाखान्यात नेले असता तिचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

## संपादकीय

# जनतेच्या प्रश्नांवर बोला

राज्यात विकास घडवून आणायचा असेल तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व स्वीकारण्यावाचून पर्याय नाही हे काही नेत्यांना उशिरा का होईना उमगले याचा आनंद असला तरी काही पक्षांसंदर्भातील राजकीय संदिग्धतेमुळे त्यांचेच पाठिराखे गोंधळात आहेत हे नाकारता येणार नाही. हा गोंधळ दूर करणारी सुस्पष्टता देणे आवाक्यातले नसेल तर किमान सामान्यांच्या गोंधळयुक्त मन:स्थितीचे रूपांतर संतापात होणार नाही याची काळजी कथित ज्येष्ठ नेत्यांनी घ्यायला हवी. बाकी, पातळी सोडून केल्या जाणाऱ्या टीकेतून प्रत्यक्ष निवडणुकांमध्ये कुणाचाच काहीही लाभ होणार नाही हे योग्य वेळी दिसेलच.

**मराठवाड्याला दुष्काळाच्या झळा बसू लागल्या आहेत. राज्यात यंदा काही भागांमध्ये पावसाचे प्रमाण खूपच कमी आहे. यात मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांचा समावेश आहे. त्यामुळेच येथील खरीपाची शेती संकटात आहे. शेतकरी चिंतातूर आहे. राज्यात यंदा १ जून ते २६ ऑगस्टदरम्यान सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. मध्य महाराष्ट्रात सरासरीपेक्षा २१ टक्के कमी पाऊस झाला, तर मराठवाड्यात सरासरीपेक्षा १८ टक्के कमी पाऊस झाला आहे. विदर्भात सरासरीपेक्षा ९ टक्के कमी पाऊस नोंदला गेला आहे. मराठवाड्यातील ८ जिल्ह्यांतील ७६ तालुक्यांमध्ये आतापासूनच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न भेडसावू लागला आहे. अशा परिस्थितीत रविवारी मराठवाड्यात जवळपास सर्वच पक्षांची नेतेमंडळी कुठल्या न कुठल्या कार्यक्रमानिमित्ताने पोहचली होती, परंतु मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्याखेरीज कुणाच्याही भाषणात शेतकऱ्यांसमोरील प्रश्नांना जागा मिळाली नाही. मुख्यमंत्री शिंदे यांनी 'महायुतीचे सरकार शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही' अशी नि:संदिग्ध ग्वाही दिली. शासन आपल्या दारी या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिंदे यांच्यासोबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हेदेखील परभणी येथे उपस्थित होते. शिंदे यांच्या भाषणाचा रोख पूर्णपणे विकासकामांवर होता, तर फडणवीस यांनी मराठवाड्याच्या पुढच्या पिढ्यांना दुष्काळ पाहावा लागणार नाही असे म्हणत त्यासाठीच्या योजनेवर भर दिला. समुद्रात वाहून जाणारे पाणी आपल्याला गोदावरी खोऱ्यात आणायचे असून पहिल्या आराखड्याला मान्यता मिळाल्यानंतर दुसरा आराखडा देणार आहे, असे फडणवीस यांनी सांगितले. सत्तेत सहभागी झालेले नवे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनीदेखील शेतकऱ्यांना दिलासा दिला. परभणी जिल्ह्यात यंदा निव्वळ ४३ टक्के पाऊस झाला आहे. पिकांची अवस्था बिकट आहेच, पण नद्यांच्या पाण्याच्या पातळीत घट झाल्याने पाण्याचे काटकसरीने नियोजन आवश्यक बनले आहे. एकीकडे शिंदे, अजित पवार आणि फडणवीस अशा तऱ्हेने जनतेच्या खऱ्या अर्थाने जिव्हाळ्याच्या प्रश्नांविषयी बोलत असताना अन्य काही राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मात्र जणु निवडणुका जाहीर झाल्याप्रमाणे प्रचार सभा घेतल्या. अर्थातच, त्यांच्या भाषणांमध्ये परस्परांविषयीच्या चिखलफेकीखेरीज काही नव्हते. जसे काही दोन दिवसांवर मतदान आले असावे अशा पद्धतीने हिंगोलीतील सभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी भारतीय जनता पक्षावर तोंडसुख घेतले, तर राष्ट्रवादी पक्षाच्या काही ज्येष्ठ नेत्यांनी राजकीय कारकीर्दीत त्यांच्यावर झालेल्या अन्यायाचा पाढा वाचला. आपली सभा कुठल्या भागात आहे, तेथील जनतेसमोर तूर्तास कुठले वास्तव आ वासून उभे आहे, त्यांना कोणत्या प्रश्नांसंदर्भात दिलासा देणे गरजेचे आहे याचे कुठलेही भान दीर्घ राजकीय वाटचालीचा अनुभव गाठिशी असलेल्या या कथित ज्येष्ठ नेत्यांच्या ठायी असू नये हे अत्यंत आश्चर्यकारक आहे.**

# राष्ट्रीय क्रीडा दिन : मेजर ध्यानचंद यांचे स्मरण



देशात २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा केला जातो. हॉकीचे सर्वकालीन महान खेळाडू मेजर ध्यानचंद या महान खेळाडूचा गौरव म्हणून २९ ऑगस्ट हा दिवस राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून देशभर साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपतींच्या हस्ते राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार, अर्जुन पुरस्कार, द्रोणाचार्य पुरस्कारांचे वितरण करण्यात येते. शिवाय खेळातील सर्वोच्च जीवन गौरव पुरस्कार म्हणून २००२पासून ध्यानचंद पुरस्कार देण्यात येतो. आपल्या कारकिर्दीत खेळात असामान्य कर्तृत्व दाखविणाऱ्या आणि निवृत्तीनंतरही त्या खेळासाठी जीवन वेचणाऱ्या क्रीडापटूला ध्यानचंद जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

आजच्याच दिवशी १९०५ रोजी उत्तर प्रदेशमधील अलाहाबाद येथे मेजर ध्यानचंद यांचा जन्म झाला होता. त्यांचे वडील सोमेश्वर दत्त सिंग हे आर्मीमध्ये असल्याने त्यांच्या वारंवार बदल्या होत. वडिलांच्या निवृत्तीनंतर १९२२ साली वयाच्या १६व्या वर्षी ते स्वतः आर्मीत दाखल झाले. त्या वेळी ते आर्मीच्या रेजिमेंटमध्ये होणाऱ्या हॉकी सामन्यात खेळताना त्यांचे हॉकीतील कौशल्य पाहून मेजर बाले तिवारी यांनी त्यांना हॉकीमधील बारकावे शिकवले. ते त्यांचे हॉकीमधील गुरु होते. पुढे मेजर ध्यानचंद हे हॉकीमध्ये इतके रमले की हॉकी म्हणजे त्यांचा जीव की प्राण ठरला. १९२२ ते १९२६ या कालावधीत त्यांनी रेजिमेंटच्या विविध स्पर्धांमध्ये आपले कौशल्य दाखवले. हॉकीतील त्यांच्या कर्तृत्वामुळे न्यूझीलंड दौऱ्यावर जाणाऱ्या इंडियन आर्मीच्या संघात त्यांची निवड झाली हा दौरा त्यांनी गाजवला. या दौऱ्यात त्यांनी आपल्या संघाला १८ विजय मिळवून दिले. दोन लढती बरोबरीत सुटल्या, तर फक्त एका लढतीत पराभव स्वीकारला. हा दौरा त्यांच्यासाठी टर्निंग पॉईंट ठरला. या दौऱ्याने त्यांना जगभर नाव मिळवून दिले. या दौऱ्यानंतर त्यांना लान्स नायक म्हणून बढती मिळाली.

केवळ भारतच नाही, तर जगातील अनेक दिग्गज खेळाडू त्यांच्या खेळाच्या प्रेमात पडले. ध्यानचंद यांचे हॉकी खेळण्याचे कौशल्य अफलातून होते. चेंडूवरची नियंत्रण ही त्यांची खासियत होती. चेंडू त्यांच्या ताब्यात असताना, मैदानावर कोणी खेळत नाही असेच वाटायचे. चेंडू त्यांच्या स्टिक जवळून हलतच नसे म्हणून त्यांच्या स्टिकमध्ये चुंबक बसवला आहे अशी अफवा तेंव्हा पसरली होती.

हॉकी हा सांघिक खेळ आहे व तो संघ भावनेनेच खेळला पाहिजे, असे मेजर ध्यानचंद यांचे मत होते म्हणूनच चेंडूवर अफलातून नियंत्रण असूनही ते आपल्या सहकाऱ्यांना अचूक पास द्यायचे. हॉकीतील त्यांच्या या कौशल्यामुळेच त्यांना हॉकीतील जादुगार असे म्हटले जायचे. मेजर ध्यानचंद यांनी आपल्या जादुई खेळाने देशाला १९२८ (अँमस्टरडॅम) १९३२ (लॉस अँजेलिस) आणि १९३६ (बर्लिन) अशा सलग तीन ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये हॉकीत भारताला सुवर्णपदक जिंकून दिले होते. १९३६मधील भारत जर्मनी यांच्यातील ऑलिम्पिकच्या अंतिम लढतीत ध्यानचंद यांच्या हॉकीतील कौशल्याने जर्मनीचा हुकूमशहा अॅडॉल्फ हिटलर यांनाही वेड लावले होते. त्यांच्या या असामान्य कौशल्याने भारावलेल्या हिटलरने त्यांना जर्मन नागरिकत्व देण्याची तसेच इंग्लिश इंडियन आर्मीत मेजरपद व कर्नलपदापर्यंत बढती देण्याचीही ऑफर दिली, पण देशप्रेमी व स्वाभिमानी ध्यानचंद यांनी ती नम्रपणे नाकारली.

लॉस अँजेलिसमध्ये खेळलेल्या भारतीय संघाचे वर्णन एका अमेरिकन पत्रकाराने पूर्वेकडील वादळ असे केले होते. ध्यानचंद १९५६मध्ये निवृत्त झाले त्याचवर्षी भारत सरकारने त्यांना पद्मभूषण देऊन गौरवले. निवृत्तीनंतर पटियाला येथील राष्ट्रीय क्रीडा संस्थेत मुख्य प्रशिक्षक म्हणून त्यांनी तरुण खेळाडूंना प्रशिक्षण दिले. भारताला सुवर्णयुगाची अनुभूती देणाऱ्या या महान हॉकीच्या जादूगाराला मरणोत्तर भारतरत्न गौरवाने सन्मानित करावे अशीच तमाम भारतीय क्रीडा रसिकांची इच्छा आहे.

**(साभार : इंटरनेट)**

# सहकारमहर्षी पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील

कारखानदारीचे आद्य प्रवर्तक. अहमदनगर जिल्ह्यातील लोणी बुद्रुक (ता. श्रीरामपूर) या खेड्यात एका शेतकरी कुटुंबात जन्म. लोणी खुर्दच्या प्राथमिक शाळेत चौथीपर्यंत शिक्षण. नंतर त्यांनी लहान वयातच शेतीला सुरुवात केली. त्या काळी शेतकऱ्यांच्या जमिनी कर्जबाजारीपणामुळे सावकारांच्या घशात गेल्यामुळे ते कंगाल बनले होते, हे नेमके हेरून त्यांनी व्हवहारबुद्धी, चातुर्य व काटकसरीने शेती केली. १९२३मध्ये लोणी बुद्रुक सहकारी पतपेढीची स्थापना करून ते सार्वजनिक जीवनातील सहकारी क्षेत्राकडे वळले. त्यांनी जिल्ह्यात सहकारी संस्थांचे जाळे निर्माण केले तसेच गावातील पाथरवट-वडार मंडळींना एकत्र आणून मजूर सहकारी सोसायटीची स्थापना केली.



इंग्रज सरकारने मुंबई कौन्सिलमध्ये तुकडे बंदी आणि तुकडे जोड हे विधेयक आणले. या विधेयकामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे तुकडे सावकाऱ्यांच्या घशात जाऊन ते जमिनीला मुकणार होते. अशा वेळी इस्लामपूर येथे शाहू महाराजांनी घेतलेल्या शेतकरी परिषदेला विखे-पाटील नगर जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांसह गेले व तेथे हजारो शेतकऱ्यापुढे भाषण देऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. त्यातूनच त्यांच्या शेतकरी नेतृत्वाचा जन्म झाला.

पुढे महाराष्ट्राच्या एक लाख शेतकऱ्यांनी याच प्रश्नासाठी पुण्याच्या कौन्सिल हॉलला वेढा घातला. त्यात विखे-पाटील आघाडीवर होते. त्यांनी शेतकऱ्यांना त्यांच्या दैन्यावस्थेची जाणीव करून देऊन, संघटित होण्याचे व त्यातून व्यक्तिगत व सामुदायिक विकास साधण्याचे महत्त्व पटवून दिले.

प्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली बेलापूर रोड (श्रीरामपूर) येथे १९४५मध्ये पार पडलेल्या द डेक्कन कॅनॉल्स बागायतदार परिषदेत विखे-पाटील यांनी सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी पद्धतीने साखर कारखाना काढण्याचा ठराव मांडला. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. गाडगीळ यांनी व उपस्थित शेतकऱ्यांनी या कारखान्याचे मुख्य प्रवर्तक म्हणूक विखे-पाटील यांच्यावरच जबाबदारी टाकली. त्यांनी ही जबाबदारी पार पाडण्यासाठी १९४५ ते १९५० या कालखंडात अतोनात कष्ट घेऊन, गावोगावी व दारोदारी भटकंती करून भागभांडवल जमविले तसेच कारखान्याला शासनाकडून मंजुरी मिळविली. कारखान्याच्या उभारणीसाठी त्यांनी केलेल्या भटकंतीकरिता शेतकऱ्यांचा एकही पैसा खर्च केला नाही. 'परान्न घेणार नाही' अशी त्यांची प्रतिज्ञा होती. त्यामुळे आपली भाकरी ते नेहमी आपल्या कोटाच्या खिशात बाळगीत असत.

प्रतिकूल परिस्थितीला तोंड देत विखे-पाटील यांनी प्रवरानगर येथे शेतकऱ्यांच्या पहिल्या प्रवरा सहकारी कारखान्याची ३१ डिसेंबर १९५० या दिवशी स्थापना केली आणि या कारखान्यातून साखर उत्पादन सुरू झाले. त्या वेळचे मुंबई राज्याचे वित्त व सहकार मंत्री वैकुंठभाई मेहता यांनी या कारखान्यास शासनाची मान्यता मिळवून देऊन सर्वतोपरीने सहकार्य केले. प्रवरानगराचा हा कारखाना आशिया खंडातील सहकारी तत्त्वावरील अग्रगण्य साखर कारखाना मानला जातो. विखे-पाटील यांनी अखिल भारतीय सहकारी साखर कारखान्यांची पहिली परिषद त्यांनी १९५६ साली प्रवरानगर येथे भरविली. विखे-पाटील यांना सरकारने त्यांना १९६१मध्ये पद्मश्री हा किताब दिला, तर पुणे विद्यापीठाने डी.लिट. (१९७८) व राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सायन्स १९७९) या पदव्या प्रदान केल्या. लोणी बुद्रुक येथे त्यांचे निधन झाले.

**-शंकरराव दिघे**



## बदलते तंत्रज्ञान

# लॅपटॉप साफ करताना या चुका टाळाव्यात

लॅपटॉप आता जवळपास सर्वच कार्यालयात जाणारे लोक वापरतात. शाळेची कामंही सहज व्हायला हवीत यासाठी मुलांनाही लॅपटॉप हवा. इलेक्ट्रॉनिक किंवा कोणतंही गॅझेट त्याची योग्य काळजी घेतली तरच दीर्घकाळ टिकतं. इलेक्ट्रॉनिक वस्तूंची स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे. लॅपटॉपची साफसफाईची करताना युजर्सनी काही गोष्टींकडे विशेष लक्ष देणं आवश्यक आहे.



साफसफाई सुरू करण्यापूर्वी लॅपटॉप बंद करा आणि कोणत्याही पॉवर सोर्सपासून अनप्लग करा. यामुळे विजेचा शॉक आणि कोणत्याही प्रकारचं नुकसान होण्याचा धोका टाळता येईल. लॅपटॉपची स्वच्छता करताना याची काळजी घेणं अत्यंत गरजेचं आहे. स्वच्छतेसाठी जे काही आवश्यक असेल ते तयार ठेवा. लॅपटॉपच्या बाहेरील भाग स्वच्छ करण्यासाठी मायक्रोफायबर कापड वापरा. धूळ, बोटांचे ठसे आणि डाग काढून टाकण्यासाठी कोरड्या मायक्रोफायबर कापडाचा वापर करून लॅपटॉपच्या बाहेरील पृष्ठभाग हळुवारपणे पुसून काढा. जर तुम्ही त्यावर जोर लावला तर तुमच्या स्क्रीनवर वाईट परिणाम होऊ शकतो आणि ती क्रॅकदेखील होऊ शकते.

कीज आणि टचपॅडमधील कचरा आणि धूळ काढण्यासाठी मऊ ब्रश किंवा कंप्रेस एयर वापरा. बोटांचे ठसे, धूळ आणि डाग काढून टाकण्यासाठी स्वच्छ मायक्रोफायबर कापडाचा वापर करून स्क्रीन हळूवारपणे पुसणे योग्य आहे. लॅपटॉप स्वच्छ करण्यासाठी घरगुती क्लिनिंग एजंट्स वापरणं टाळा, कारण ते लॅपटॉपच्या पृष्ठभागाला हानी पोहोचवू शकतात.

लॅपटॉपच्या व्हेंट्स आणि पोर्टमधून धूळ काढण्यासाठी कॉम्प्रेस्ड एअर वापरा. डिव्हाइसमध्ये धूळ जाण्यापासून रोखण्यासाठी लॅपटॉप वेगळ्या अँगलमध्ये धरूनच साफ करा. लक्षात ठेवा लॅपटॉपच्या चार्जिंग पोर्टवर कोणतीही तीक्ष्ण वस्तू ठेवण्याचा प्रयत्न करू नका. यामुळे पोर्टच्या आत काही प्रमाणात नुकसान होऊ शकतं.

लॅपटॉप टिल्ट करा आणि हलके टॅप करा जेणेकरून कचरा बाहेर येईल. उर्वरित कचरा बाहेर काढण्यासाठी तुम्ही कॉम्प्रेस्ड एअर देखील वापरू शकता. कीबोर्ड साफ करण्यासाठी कोणतेही द्रव वापरू नका, कारण ते कीजच्या मध्ये जाऊन नुकसान होऊ शकतं. धूळ जमा झाल्यामुळे तुमच्या लॅपटॉपच्या कार्यक्षमतेवर परिणाम होत असल्याची तुम्हाला शंका असल्यास, एखाद्या प्रोफेशनलकडून त्याची तपासणी करा.

# चित्रपट अभिनेत्री जयश्री गडकर

मराठी चित्रपटसृष्टीतील नृत्यांगना जयश्री गडकर यांच्या जीवनावर आणि प्रवासावर आधारित आहे. जयश्री गडकर एक प्रसिद्ध मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील सुप्रसिद्ध अभिनेत्री जयश्री गडकर. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया लेखातून त्यांच्याविषयी...

या १९५० ते १९८० च्या दशकापर्यंत ती मराठी चित्रपटाची आयकॉन होत्या. भारतातील कर्नाटक राज्यातील उत्तरा कन्नड जिल्ह्यातील कारवारपासून जवळ असलेल्या कनसगिरी येथील एका कोकणी भाषिक कुटुंबात जयश्रीचा जन्म २१ मार्च १९४२ रोजी झाला.

रामानंद सागर यांच्या मागील रामायण या दूरदर्शन मालिकेत जयश्रीने कौशलची भूमिका साकारली होती. त्यात राजा दशरथच्या भूमिकेसाठी प्रसिद्ध असलेला अभिनेता बाळ धुरी आणि जयश्री यांचा विवाह झाला होता. गडकर यांनी तरुण असतानाच नृत्यांगना म्हणून व्यवसायाला सुरुवात केली. चित्रपटांमध्ये तमाशा नृत्यांगना व्हा. त्यांचा पहिला भाग १९५५मध्ये आलेल्या व्ही. शांतारामचे वडील पायल हे बाजे येथील नृत्य गटाचे सदस्य होते, ज्यामध्ये जयश्रीने प्रमुख भूमिका साकारली होती. १९५६मध्ये वयाच्या चौदाव्या वर्षी दिसतं तसं नसतं या



## निमित्त

चित्रपटाद्वारे अभिनयक्षेत्रात पदार्पण झाले. नंतर दिनकर पाटील दिग्दर्शित सीतां तसम नसथन या मराठी चित्रपटात ती राजा गोसावी यांच्यासोबत एका छोट्या नृत्याच्या भूमिकेत दिसली. त्यानंतर आलेला पहिला चित्रपट ज्यात त्याने मुख्य भूमिका केली होती, बनथ्ये आयका, जो तमशावर आधारित होता. त्या चित्रपटामुळे तिला ओळख मिळाली आणि ती मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वांत समृद्ध आणि यशस्वी नायिका बनली. आपल्या कारकिर्दीत जयश्रीने २५०हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले. त्यात तमाशा, प्रेम आणि गरीब-श्रीमंत कथांचे वैशिष्ट्य होते.

जयश्री गडकर यांचे पती बाळ धुरी आणि चिरंजीव अविनाश आणि विश्वजीत धुरी ूंनी जयश्री गडकरांच्या जीवनप्रवासावर वरील नावाचा एक कार्यक्रम बनवला आहे. त्यात मधुरा दातार आणि प्रशांत नासेरी काम करीत असून तुषार दळवी आणि दीप्ती भागवत यांचे सूत्रसंचालन आहे. या कार्यक्रमाचा शुभारंभ १७ जानेवारी २०१७ रोजी झाला.

जयश्रीबाईंना अनेक मानसन्मानांनी गौरवण्यात आले. मानिनी, वैजयंता, सवाल माझा ऐका, साधी माणसं, पवनाकाठचा धोंडी या चित्रपटांसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्री या राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. साधी माणसं, पाटलाची सून, थांब लक्ष्मी कुंकू लावते आणि घरगंगेच्या काठी या चित्रपटांसाठी त्यांना उत्कृष्ट अभिनेत्रीचे राज्य पुरस्कार प्राप्त झाले. घरकुलसाठी विशेष अभिनेत्री राज्य पुरस्कार त्यांना देण्यात आला. त्यांच्या चित्रपटसृष्टीतील यशस्वी कारकीर्दीकरता त्यांना व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार, ग. दि. माडगूळकर आणि जनकवी पी.सावळाराम पुरस्कार यांनी गौरवण्यात आले. त्यांचे अशी मी जयश्री हे आत्मचरित्र १९८६ साली प्रसिद्ध झाले. यामध्ये त्यांनी आपल्या चित्रपटातील कारकीर्दीचा वेध घेतला आहे. त्यांचे २९ ऑगस्ट २००८ रोजी मुंबईत हृदयविकाराने निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

**क्लिक...क्लिक...!**



अलिबाग : श्रावणात अधूनमधून पावसाच्या सरी येत असल्याने भातपिकाची वाढ होताना दिसत आहे.

## आरोग्य प्रहर

# ब्रेकफास्ट करण्याची योग्य वेळ जाणून घ्या...

ब्रेकफास्ट खूप महत्त्वाचा असतो. दिवसाच्या सुरुवातीलाच नाश्ता केल्याने आपल्याला दिवसभर ऊर्जा मिळते. आरोग्यतज्ज्ञ ब्रेकफास्टबद्दल नेहमीच बोलताना दिसतात ब्रेकफास्टमध्ये काय खाल्लं पाहिजे, किती खाल्लं पाहिजे. असंही म्हटलं जातं की ब्रेकफास्ट राजासारखा असावा. आरोग्यतज्ज्ञांच्या मते, नाश्ता करण्याची सर्वोत्तम वेळ सकाळी ७ ते ८ दरम्यान आहे. काही कारणास्तव तुम्हाला या वेळी नाश्ता करता येत नसेल तर सकाळी १०च्या आधी नाश्ता करा, कारण रात्रभर बराच वेळ काहीच न खाल्ल्यामुळे शरीराला ऊर्जेची गरज असते आणि सकाळी शरीरातील ग्लुकोजची पातळी सहसा कमी असते. नाश्ता केल्याने शरीराला ऊर्जा मिळते आणि पचनसंस्थाही व्यवस्थित काम करते.



**वेळेत नाश्ता केल्याने**

सकाळी उशीरा उठल्यास उठल्यानंतर तासाभराच्या आत नाश्ता करणे चांगले. वेळेत नाश्ता केल्याने शरीरातील अनेक समस्या दूर होतात. योग्य वेळी नाश्ता करणे आपल्या आरोग्यासाठी आणि संतुलित जीवनशैलीसाठी खूप महत्वाचे आहे. जर तुम्ही योग्य वेळी नाश्ता केला नाही तर तुमची भूक वाढू शकते आणि नंतर तुम्ही जास्त अन्न खाता. यामुळे तुमचे वजन वाढण्याची शक्यताही वाढते.

**नाश्त्याचे उत्तम पर्याय**

ओट्स : ओट्स एक निरोगी आणि पौष्टिक स्नॅक आहे. ते फायबरमध्ये समृद्ध असतात, जे आपल्या पाचन तंत्रास निरोगी ठेवण्यास मदत करतात. ओट्स दूध, दही किंवा पाण्यामध्ये बनवून खाता येतात.

ऑमलेट : ऑमलेट हा प्रोटीनयुक्त स्नॅक आहे. आपण टोमॅटो, हिरवी मिरची आणि कांदा यासारख्या भाज्या आपल्या ऑमलेटमध्ये देखील घालू शकता.

टोस्ट : टोस्ट हा एक सोपा स्नॅक आहे. आपण आपल्या टोस्टवर फळे, जॅम, चीज किंवा अंडा चीज लावून ते ब्रेड खाऊ शकता.

दलिया : दलिया हे ओट्स इतकेच पौष्टिक असते. हे देखील दूध, दही किंवा पाण्यासोबत बनवले जातात. आपण ते फळे, शेंगदाणे किंवा बियांमध्ये देखील मिसळू शकता.

फळे आणि दही : फळे आणि दही एक स्वादिष्ट आणि पौष्टिक स्नॅक आहे. फळे आपल्याला जीवनसत्त्वे आणि खनिजांचे पूरक आहार प्रदान करतात. दही आपल्याला प्रथिने आणि कॅल्शियम प्रदान करते.

**(ही माहिती घरगुती व सामान्य माहितीवर आधारित आहे.)**

# कनकेश्वर देवस्थान सुशोभिकरणाचा शुभारंभ

## रोप वे, विजेची सुविधा; सर्वतोपरी सहकार्य -आमदार दळवी




**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

तालुक्यातील प्रसिद्ध श्री क्षेत्र कनकेश्वर येथे रोपवे, विजेची सुविधा व सुशोभिकरणासाठी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने पाच कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या सुशोभिकरणाच्या कामांचा शुभारंभ आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते करण्यात आला, तसेच श्रावणी सोमवारनिमित्त सर्व भाविकांसाठी फराळ वाटप करण्यात आले.

या वेळी आमदार महेंद्र दळवी म्हणाले की, कनकेश्वर हे आपल्या तालुक्यातील पुरातन आणि भाविकांचे श्रद्धास्थान आहे. त्याचप्रमाणे अनेक पर्यटकही या पुरातन मंदिराला भेटी देत असतात. त्यामुळे या देवस्थानचा पर्यटन क्षेत्र म्हणून त्याचा विकास करण्यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. या ठिकाणी भाविकांना ज्या सुविधा लागतील त्या देण्यास आम्ही सर्वतोपरी सहकार्य करू, असे आश्वासन दिले.

कनकेश्वर देवस्थानचा विकास होत असल्याने तालुक्यातील नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे. कार्यक्रमाला भाजप भटके विमुक्त आघाडी राज्य सरचिटणीस तथा बेलदार समाज महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजू साळुंके, जगदीश सावंत, उपविभाग प्रमुख नंदकुमार पाटील, अनिल पाटील, जीवन परदेशी, अनिल म्हात्रे, राजू साळुंके, अमर वरसोलकर, मोसिक खान, ग्रामपंचायत सदस्य व अधिकारी वर्ग हजर होते.

# मुख्यालयी न राहल्यास शिस्तभंगाची कारवाई

**कर्जत : प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बॉस्टेवाड यांनी जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी वरिष्ठांच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, अशा सूचना दिल्या आहेत. तशा आदेशाचे पत्र सर्व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. अनेक ठिकाणी अधिकारी मुख्यालयी राहात नसल्याच्या तक्रारी आल्याने आदेश काढण्यात आले असल्याचे सांगण्यात आले आहे.

सध्या राज्यात लंपी रोगाचा प्रादुर्भाव वाढत असून त्याची झळ रायगड जिल्हाला देखील बसली या पार्श्वभूमीवर सर्व पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी आपल्या मुख्यालयात राहून सेवा देणे कर्तव्य असून त्यांचे काटेकोरपणे पालन करावे तसेच ग्रामसेवक अधिकारी, सरपंच यांच्याशी संपर्क करून त्यांना रोगाविषयी माहिती देऊन प्रशिक्षण तसेच रोगा बाबत जनजागृती करावी. महाराष्ट्र पशुमत्स्य विभाग विज्ञान विद्यापीठ यांनी तयार केलेली चित्रफित प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत माहिती कशी पोहचवता येईल याबाबत प्रयत्न करावेत. बहुतांशी पशुवैद्यकीय डॉक्टर हे मुख्यालयात न राहता घर भाडे घेऊन शासनाची फसवणूक करीत आहे.

कर्जत तालुक्यातील बहुतांश डॉक्टर दवाखानात गैरहजर राहून खासगी दवाखाने चालवतात आहेत. जे पशुवैद्यकीय अधिकारी मुख्यालयात राहणार नाहीत त्यांचे घरभाडे बंद करून (शिस्त व अपिल) नियम १९७८ नुसार शिस्त भंगाची कारवाई करण्यात येईल, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. बॉस्टेवाड यांनी पत्रात नमूद केले आहे.

# रायगडातील शिक्षक घेताहेत तंत्रज्ञानाचे धडे

**अलिबाग : प्रतिनिधी**

राजिपेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना रोबोटिक्स आणि कोडींगचे धडे मिळणार आहेत. विद्यार्थ्यांमधील संशोधन वृत्ती वाढीस लावणे व तंत्रज्ञानाची आवड निर्माण व्हावे याकरिता रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये नावीन्यपूर्ण उपक्रमा अंतर्गत डीपीडीसी योजनेतून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

सुरुवातीला ३१ शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून, या शाळांमधील शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे.

रोबोटिक्स आणि कोडींगचे बाबत शिक्षकांना लाईफ स्पिक्सही संस्था तीन बॅचमध्ये प्रशिक्षण देणार आहे. यामधील पहिली बॅच नुकतीच अलिबाग तालुक्यातील वयशेत या शाळेत झाली. या उपक्रमांतर्गत जिल्हा परिषदेच्या विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण होणे व दिलेल्या सहित्यामधून विविध शोध लावण्याची सवय निर्माण होणे यासाठी मोठी संधी रायगड जिल्हा परिषदेने उपलब्ध करून दिली आहे. उपक्रमांतर्गत ३१ शाळांना यापूर्वीच रोबोटिक साहित्याचे संच दिलेले आहेत. या साहित्याची ओळख व त्यापासून विविध स्वयंचलित उपकरणे निर्मितीचे प्रात्यक्षिक शिक्षकांकडून तयार करून प्रशिक्षण दरम्यान घेण्यात आले, असल्याची माहिती प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली.

या वेळी उपशिक्षणाधिकारी सुनिल भोपळे, समग्र शिक्षा अभियान उपशिक्षणाधिकारी संतोष शेडगे, वायशेत केंद्रप्रमुख विकास पाटील, संदीप वारगे, अक्षय पाटील उपस्थित होते.



# पेडली शाळेस फॅन, साऊंड सिस्टीम भेट

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील शारदा विद्यामंदिर माध्यमिक हायस्कूल पेडली शाळेस सन २००५च्या दहावीच्या बॅचकडून फॅन व साऊंड सिस्टीम भेट देण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी जागृती शिक्षक प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, माजी मुख्याध्यपक जे. बी. गोळे यांची निवड मुख्याध्यापक कृष्णा हेमाडे सरांच्या अनुमोदनाने करण्यात आली. राजेश गोळे यांच्या हस्ते सर्व उपस्थित शिक्षक वर्गाचे गुलाबाचे फुल देऊन विद्यार्थ्यांनी स्वागत केले. या वेळी शारदा विद्यामंदिर हायस्कूल पेडलीचे मुख्याध्यापक कृष्णा हेमाडे, शिक्षक प्रदीप गोळे, हिरामण तांडेल, पांडुरंग आवतडे, जे. डी. म्हात्रे, पी. बी. पाटील, सुमन शिंदे, मनीषा भिलारे, अनिता साबळे, वैशाली शिरसाट, सेवानिवृत्त शिक्षक विश्वास निकम, शशिकांत पारखे तसेच शाळेचे शिपाई कर्मचारी वर्ग गजानन हिंगणे, विठ्ठल डोके, कृष्णा मैराळे आदी मान्यवर उपस्थित होते.




# कर्जतमध्ये मतदार नोंदणी शिबिरास प्रतिसाद



**कर्जत : प्रतिनिधी**

आमदार महेंद्र थोरवे फाऊंडेशन आणि कर्जत शहर शिवसेना कमिटीच्या वतीने नवीन मतदान नोंदणी व आभा कार्डचे आयोजन करण्यात आले होते.

नवीन मतदार आणि स्थलांतरित मतदार असे एकूण २६७ लोकांनी तर आभा कार्डसाठी ४१८ लोकांनी शिबिराचा लाभ घेतला. दहिवली विचार मंचचे डमीन सुनील जाधव, नगरसेवक संकेत भासे, अभिषेक सुर्वे यांच्या हस्ते शिबिराचे उद्‌घाटन झाले. या वेळी उपशहर प्रमुख दिनेश कडू, सचिन भोईर, गिरीश सर्वे, अकिब पाटील, विशाल निमकर्डे, सौरभ केदारी, हार्षल मोरे, संदीप देशमुख, मंगेश म्हसे, नंदू गुरव, संजय वरघडे, संदेश भासे, विदुल सावंत, किशोर देशमुख, महिला पदाधिकारी शुभांगी कडू, पूनम शिर्के, करिश्मा भासे, अरूणा मोरे, पंकज पवार, मिथिलेश म्हामुणकर, केतन मोधळे, रितेश वायकर उपस्थित होते.

# दोन दुचाकींची समोरासमोर धडक; एकाचा मृत्यू, तिघे जखमी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दोन दुचाकींची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू तर तिघे जखमी झाल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बोरिवली गावच्या रिलायन्स पेट्रोलपंपासमोर घडली.

सिध्देश्वरी ते वाशिवलीदरम्यान दुचाकीवरून प्रवास करीत असताना बेरिवली गावाजवळच्या रिलायन्स पेट्रोल पंपासमोर येताच समोरासमोर धडक होऊन अपघात झाला. या अपघातात गजानन दत्तू पवार (वय ५१, रा. वयाळ वाशिवली) यांचा मृत्यू झाला, तर अमित शुक्ला (वय ३०, रा. बेलेंद्रा), दिनेश बाळाराम पवार (वय २६, रा. तळवलीवाडी), नितिन लक्ष्मण वाघे (रा. तळवलीवाडी) हे तिघे जखमी झाले आहेत. जखमींना एमजीएम हॉस्पिटलात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. याबाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरक्षनाथ बालवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार सरोदे, पोसई पवार अधिक तपास करीत आहेत.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळवीण्यात येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत जमीन मालक श्री.दत्तात्रेय दामु ठाकूर यांचेकडून विकत घेण्याच्या विचारात आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणेः

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे - वांगणी तर्फे वाजे, ता. पनवेल, जि. रायगड**

| सर्व्हे / गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु.- पै. |
|---|---|---|---|
| १२५ | २० | ० हे - ३८ आर.- ९० पॉ.. | ९ - ०० |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ, अथवा, अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यावर '१४' दिवसांच्या आत' आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहित व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे, आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. विजय रामराव सुरडकर,**

**ठि.: पनवेल**
**दि. 29/08/2023**

**पत्ता :**४०३,श्री. आराधना कॉ.ऑप. होऊ. सोसा.,से-५,प्लॉट नं .३६, सानपाडा ,नवी . मुंबई :४००७०५, **फो :9870099284**

## कर्जत नगरपरिषद, कर्जत
## जाहीर निविदा सूचना

कर्जत नगरपरिषद हे खालील कामांसाठी नोंदणीकृत ठेकेदार/पुरवठादार/उत्पादक यांचेकडून कोटेशन मागवित आहे. ठेकेदारांनी आपल्याकडील सिलबंद कोटेशन दि. ०५/०९/२०२३, सायं. ४.०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी कर्जत नगरपरिषद यांचे नावे सादर करावे. प्राप्त कोटेशन शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ४.३० वा. उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत येतील. कोणतेही कारण न देता एक अगर सर्व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेटरहेडवर दर सादर करणे |
|---|---|---|
| 1 | Supplying and erecting DC LED flood light fitting of 24V 100W | प्रती नग दर |
| 2 | Supplying, installing, testing and commissioning of solar Panel Comprising high efficiency poly-crystalline photovoltaic cell 335 Wp 24V | प्रती नग दर |
| 3 | Supplying, installing, testing and commissioning of Lifepo 4 battery with capacity of 24V - 100 Ah | प्रती नग दर |

दिनांक : २८/०८/२०२३
जावक क्रमांक : १६४८/२३-२४

**सही/-**
**(वैभव गारवे)**
मुख्याधिकारी
कर्जत नगरपरिषद

**सही/-**
**(सौ.सुवर्णा केतन जोशी)**
अध्यक्ष
कर्जत नगरपरिषद

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे आशिलांनी त्याचे विद्यमान मालक सौ. लताबाई दगडू काजारी व इतर आठ यांच्याकडून कायमस्वरूपी खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**-: मिळकतीचे वर्णन:-**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार रुपै |
|---|---|---|---|
| २ | १ | ००-०३-०० पो.ख : ००-०१-५० **एकूण क्षेत्र : ००-४-५०** | ०-०५ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीज, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरुपाचा कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात ) दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील, मागाहून मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाण : नेरळ
दिनांक :- २८/०८/२०२३

सही/-
ॲड : निकेश खंडू गायकर

पत्ता :- मु. पाली (नवीन वसाहत) पो:- चिंचवली, ता-कर्जत, जिल्हा-रायगड पिन ४१०२०. मो : ९१३६२३१९४५

## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने सर्व जनतेस या नोटीसिद्वारे असे सुचित करण्यात येते कि, खालील भुखंडाचे मालक **१) श्री. सुलाबाई जोमा कोळी २) श्री. बळीराम जोमा कोळी ३) श्री. सुरेश जोमा कोळी ४) श्रीमती.चंद्राबाई गजानन कोळी,** रा.: पी.एम.जी.आय. कॉलनी, ६ वा मजला, रूम नं.६१३, न्यु म्हाडा कॉलनी, आंबेडकर नगर, मानखुर्द.मुंबई ४०००४३ यांच्या नावे सिडकोकडून प्रस्तावित नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ व अनुषंगिक कामासाठी गावठाणामधिल संपादीत करण्यात येणाऱ्या जमिनीबद्दल व त्यामधिल स्थलांतरीत होणाऱ्या निवासी वापराच्या बांधकामाबद्दल नुकसान भरपाईपोटी व पुनःस्थापनेसाठी निवासी वापराकरीता ''भुखंड क्र.४२९ क्षेत्रफळ २८० चौ.मी.. से.२५ ए, पुष्पक-वहाळ नोड, नवी मुंबई, ता. पनवेल, जि. रायगड'' या वर्णनाचा भुखंड वितरीत झालेला आहे. सदर भुखंड माझे अशिल **मे.एम. के. इन्फ्रा तर्फे भागिदार १) श्री.मोहम्मद गौस काश्मिरी व २) श्रीमती कौसर जान काश्मिरी** कार्यालयिन पत्ता - से.४४, सिवुडस,नेरूळ, नवी मुंबई. यांना ५०%-५०% तत्त्वावर विकसित करण्यासाठी दिलेला आहे. सदर भुखंडामधील माझ्या अशिलांच्या हिश्श्याचा १०% भुखंड ते त्यांच्या नावे त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे कायमस्वरूपी हस्तांतरण करीत आहेत.

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| पुष्पक वहाळ | २५ए | ४२९ | २८०.०० चौ.मी. |

तरी कोणीही व्यक्ती/व्यक्तीचे किंवा अर्थिक संस्थांचे सदर भुखंड संदर्भात कुठल्याही प्रकारचे दावा, हरकती, जसे विक्री, बोजा, दान, गहाण, सरकारी निमसरकारी, कंपनी बक्षीस भाडेपट्टा, वारसा हक्क, लोन किंवा इतर काही असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत या भुखंडाच्या संबंधित कागद पत्रासोबत माझ्या कार्यालयिन पत्त्यावर संपर्क साधावा. अन्यथा सदर भुखंडाच्या त्रिपक्षिय करारनाम्याद्वारे हस्तांतरण करण्याची प्रक्रीया पुर्ण करण्यात येईल. त्यानंतर आलेल्या कुठल्याही प्रकारच्या हरकती/तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.

दि. २९/०८/२०२३

**सही/-**
**ॲड. निरंत वासुदेव पाटील**

**कार्यालय** : तळ मजला, प्लॉट नं. बी४०, से.२०, अष्टविनायक बिल्डींग, नेरूळ गाव, नवी मुंबई. ४००७०६. मो.९३२४५६९८०६.

सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यांत येते की, मौजे-वहाळ, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक श्रीमती बानूबाई सावळाराम पाटील व श्री. दामजी गणा पाटील यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायदयानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

**संपादित जमीन व इरादित भूखंडांचा तपशील पुढीलप्रमाणे:**

| गावाचे नाव/संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे नं./हिस्सा नं. | संपादित क्षेत्र (हे. आर) | निवाडाधारकाचे नाव | भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| उलवे २४५ | वहाळ ५७७ | ४३/५<br>६९/३<br>८६/६<br>१११/१४<br>११४/९<br>१२४/९<br>९२/१५<br>१२८/६ | ०-०९-५<br>०-०७-७<br>०-०६-०<br>०-०४-०<br>०-०२-८<br>०-०९-१<br>०-०१-३<br>०-०४-३ | श्रीमती बानूबाई सावळाराम पाटील व श्री. दामजी गणा पाटील | उलवे | १९ | ४२७ | ४०० |
| **एकूण** | | | **०-४४-७** | | | | | |

शासन निर्णयानूसार वर नमूद संपादित जमिनीपोटी साडेबारा टक्के योजनेअंतर्गत उलवे नोड येथील भुखंड क्र. ४२७, सेक्टर- १९, क्षेत्र-४०० चौ.मी. या भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या मुळ भूधारकांपैकी श्रीमती बानूबाई सावळाराम पाटील यांनी दुय्यम निबंधक पनवेल-१ येथे दि. २७.०७.२०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-६०६२-२०२३ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित संपादित जमिनीन्वये मिळणाऱ्या उलवे संचिका क्र. २४५ मधील उलवे नोड येथील इरादित भुखंड क्र.४२७, सेक्टर-१९, क्षेत्र-४०० चौ. मी. या भुखंडाचे लाभ कै. दामजी गणा पाटील (मयत) यांचे वारस १) श्री. महादेव दामजी पाटील यांच्या लाभात हस्तांतरित केले आहेत.

सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ट ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या '१० अ' मधील मुद्दा क्र. ii अन्वये सदर हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र. सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे वर नमूद हक्कसोडपत्रामध्ये उलवे नोड येथील इरादित भुखंड क्र.४२७, सेक्टर-१९, क्षेत्र-४०० चौ. मी. भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे वहाळ येथील निवाडा क्र. ५७७, स.नं/हि.नं. ४३/५ व इतर, क्षेत्र ०-४४-७ हे. आर. या संपादित जमिनीचा देखील उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|---|
| श्रीमती बानूबाई सावळाराम पाटील | कै. दामजी गणा पाटील (मयत) यांचे वारस<br>१) श्री. महादेव दामजी पाटील |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून खालील व्यक्ती उपरोक्त भूखंडाचे वाटप स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिचे नाव |
|---|
| कै. दामजी गणा पाटील (मयत) यांचे वारस<br>१) श्री. महादेव दामजी पाटील |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत / तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून (३०) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्यत्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोव्दारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशिर कार्यवाहीबददल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहिर सूचना ही संबंधीत गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी सुचना फलकावर चिटकविणेत याव्यात.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
सिडको/जनसंपर्क/२७८/२०२३-२४

## निवडक



### निराधार महिलेस मदतीचा हात

**उरण** : पिरकोन गावातील सामाजिक कार्यकर्त्या बिंदू मुकुंद गावंड यांनी स्वखर्चाने गावातील फळ व भाजी विक्रेती महानंदा पाटील या निराधार महिलेस स्वखर्चाने विजेवर चालणारा वजनकाटा मदत स्वरुपात दिला. महानंदा विश्वनाथ पाटील यांनी बिंदू गावंड यांचे आभार मानले. या वेळी सरपंच लीलावती पाटील, भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, उपसरपंच राजश्री म्हात्रे, उरण ओबीसी सेलचे सचिव प्रा. प्रमोद म्हात्रे, तालुका पदाधिकारी रवी म्हात्रे, पिरकोन उपाध्यक्ष बाळकृष्ण पाटील, श्री गणेश महिला स्वयंसहाय्यता बचत गटाच्या अध्यक्ष लक्ष्मी गावंड, सदस्य शारदा गावंड आदी उपस्थित होते.

### वृद्धाश्रमात ‘अक्षर मानव’चे कविसंमेलन

**रसायनी** : येथील शांतीवन वृद्धाश्रमातील वृद्धांसाठी रविवारी (दि. २७)अक्षर मानव ग्रंथालय, कविता विभाग यांच्यातर्फे कविसंमेलन झाले. ग्रंथालय विभाग प्रमुख रोहिदास कवळे यांनी अक्षर मानवची भूमिका विषद केली. ज्येष्ठ कवी गुणवंत सीताराम पाटील आणि अत्तारताईंनी सामाजिक आशयाच्या कविता आणि गझल सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. रोहिदास कवळे यांच्या प्रेम कवितांनी कवी संमेलनास रंगत आणली. कविसंमेलनास अक्षर मानव रायगड जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. पूर्णिमा सुतार, कार्यवाह विनायक देसाई उपस्थित होत्या. त्यांनी वृद्धांसाठी भेटवस्तू दिल्या. शांतीवन येथील वाचनालयासाठी रोहिदास कवळे यांनी पुस्तके भेट दिली.

### सीवूड्समध्ये नवीन मतदार नोंदणी शिबिर

**नवी मुंबई** : आमदार मंदा म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली, माजी नगरसेविका कविता जाधव व माजी नगरसेवक भरत जाधव यांच्या वतीने सोमवारी (दि. २८) सीवूड्स येथील गौरव महाविद्यालयामध्ये नवीन मतदार नोंदणी व दुरुस्ती शिबिर घेण्यात आले. या शिबिरात मोठ्या संख्येने नागरिकांनीही उत्स्फूर्द प्रतिसाद दिला. दर रविवारी सीवूड्स विभागातील तरुण-तरुणींना व ज्येष्ठ नागरिकांना नवीन मतदार नोंदणी करावयाची असल्यास माजी नगरसेविका कविता जाधव व माजी नगरसेवक भरत जाधव यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन या वेळी करण्यात आले. शिबिरासाठी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत माजी नगरसेवक भरत जाधव, माजी नगरसेविका कविता जाधव, रणजीत निंबाळकर, आदित्य जाधव, अभि कदम, विनायक गिरी, अज्यू कदम, मयूर कल्युड, प्रसाद ठाकूर तसेच कार्यकर्ते, पदाधिकारी व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# ज्येष्ठांच्या सर्व उपक्रमांना सहकार्य -लोकनेते रामशेठ ठाकूर

## उलवे नोड येथे विरंगुळा केंद्राचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ज्येष्ठ नागरिकांना एकत्र येऊन वेळेचा सदुपयोग करता यावा, गप्पा मारता याव्यात, विचार विनिमय करता यावा यासाठी उपयुक्त ठरेल असे निवारा असणारे विरंगुळा केंद्र उभारल्याचे समाधान माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केले.

उलवे नोड येथील सेक्टर १७मधील बिकानेर चौकामध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी उभारण्यात आलेल्या विरंगुळा केंद्राचे उद्घाटन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते झाले. त्या वेळी ते बोलत होते. या वेळी उद्घाटनपर भाषणात पुढे बोलताना लोकनेते रामशेठ




ठाकूर यांनी ज्येष्ठांच्या सर्व उपक्रमांना सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

या उद्घाटन सोहळ्यास गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, महिला मोर्चाच्या अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, वहाळ ग्रामपंचायत उपसरपंच अमर म्हात्रे, सुधीर ठाकूर, उत्तर भारतीय संघाचे अध्यक्ष अवधेश महतो, आशीष, माजी पोलीस इन्स्पेक्टर देशमुख तसेच ज्येष्ठ नागरिक संघाचे संस्थापक सदस्य बबनराव चौरे, कार्यकारी अध्यक्ष प्रा. राम देवरे, प्रदीप गायकवाड, सुरेश देवळेकर, केशव काळपुंड, तात्यासाहेब कोडग, रवी धस, मोहनराव गाडे पाटील, गोरखनाथ कांबळे, अमृत कटारनवरे, जानू जाधव, सर्जेराव सातपुते, दिनकर लोंढे, बाळूशेठ भोईर, दत्तात्रय मोकल, किसनराव तळेकर, काशिनाथ पाटील, भगवानराव माने, राम म्हात्रे, गणपत गायकर, शरद पवार, शरद शिंदे, पांडुरंग शिंदे, विजय गोगले, कर्नल सिंग, नितीन ठक्कर, जयवंत घरत, अशोक कळके, के. डी. भालके, हेमंत नेहते, विष्णू बोराटे, नितीन यादव, ज्ञानदेव गुंजाळ, नरेंद्र म्हात्रे, पोपट कदम, अमित कारंडे, विलास श्रीखंडे, गणेश मदने, अविनाश कजबजे, राजेंद्र चौधरी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन सागरकुमार रंधवे यांनी केले.

## राष्ट्रीय समूहगीत स्पर्धेत सीकेटी इंग्रजी विद्यालयाचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारत विकास परिषद, पनवेलतर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय समूहगान स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या चांगू काना ठाकूर (सीकेटी) इंग्रजी माध्यम विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. या स्पर्धेत प्रत्येक विद्यालयाने एक हिंदी आणि एक संस्कृत अशी दोन देशभक्तीपर गीते सादर करायची होती. दोन्ही गीतांच्या गुणांची बेरीज करून विजेत्यांची नावे घोषित करण्यात आली. ‘राष्ट्रीय चेतना के स्वर’ या पुस्ताकातीलच गीते सादर करणे आवश्यक होते.

या वेळी मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी सांगितले की, गेले अनेक दिवस दररोज संगीत शिक्षिका सुप्रिया ताम्हनकर आणि संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या स्पर्धेसाठी भरपूर सराव केला होता. या सरावाचेच हे फलित आहे. पनवेल परिसरातील चौदा शाळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. ही स्पर्धा रविवारी (दि. २७) आद्यक्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके विद्यालयात झाली.

या विद्यार्थ्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी गडदे, संस्थेचे सर्व पदाधिकारी, मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मार्गदर्शक शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.




## एनएमएमटीचा तुर्भे सर्व्हिस रोडवरील बसथांबा अखेर स्थलांतरित

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

आयसीएल शाळेजवळील सर्व्हिस रोडवरून एकही बस जात नसल्याने त्या ठिकाणी असलेला बसथांबा मुख्य रस्त्यावर स्थलांतरित करावा अशी मागणी अनेकदा प्रवाशांनी केली होती. याविषयी वृत्त प्रसिद्ध करताच हा थांबा मुख्य रस्त्यावर स्थलांतरित करण्यात आला आहे. त्यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.

वाशी-तुर्भे लिंक रोडवर हा केवळ दोन मार्गिकेचा मार्ग आहे. या मुख्य मार्गावरून प्रवासी बस जात असल्याने ठिकठिकाणच्या बसथांब्यावर बस थांबताच वाहतूक कोंडी होत होती. त्यामुळे मुख्य रस्त्यावरील बसथांबे काढून ते



वाशीहून तुर्भेकडे येणाऱ्या सर्व्हिस रोडवर लावण्यात आले. मुख्य मार्गावरून येणारी बस प्रवाशांना चढ उतार करण्यासाठी सर्व्हिस रोडवर जाऊन पुन्हा मुख्य रस्त्यावरून पुढे जाईल, अशी संकल्पना होती, मात्र तसे झाले नाही.

सुमारे १० वर्षे आयसीएल शाळेजवळील सर्व्हिस रोडवरील हा बसथांबा जैसे थे होता. बस मुख्य मार्गावरच थांबत होती. त्यामुळे हा थांबा मुख्य मार्गालगत लावण्यात यावा अशी मागणी वारंवार प्रवाशांकडून केली जात होती. अखेर एनएमएमटीने हा बसथांबा मुख्य मार्गालगत स्थलांतरित केला. यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

### कोकण विभागात पावसाची विश्रांती

**नवी मुंबई** : कोकण विभागात सोमवारी (दि.२८) सरासरी १५.६ मिमी पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद रत्नागिरी जिल्ह्यात २०.९ मिमी झाली आहे. कोकण विभागात आतापर्यंत एकूण २४१८.५ मिमी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्हानिहाय ठाणे १७.९ मिमी, पालघर ११.३ मिमी, रायगड १८.४ मिमी, रत्नागिरी २०.९ मिमी, सिंधुदुर्ग ०३.५ मिमी अशी नोंद आहे.

## ‘विद्यार्थ्यांना कायद्याची माहिती असणे गरजेचे’

**उरण : प्रतिनिधी**

एक महिला सुशिक्षित झाली तर संपूर्ण कुटुंब सुशिक्षित होते. महिलांकडे बघण्याचा दृष्टीकोन सध्या बदलण्याची गरज आहे. त्यामुळे शाळेच्या जीवनातच कायद्याची माहिती असणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन न्हावा शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर यांनी केले.

रयत शिक्षण संस्थेचे येथील वीर वाजेकर कॉलेजमध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी. एम. मुजावर यांनी भेट देऊन वाहतूक सुरक्षा व नियम याबाबत



जनजागृती व्हावी या दृष्टीने मार्गदर्शन केले, तसेच उपस्थित मुलामुलींना भारतातील महिलांना संरक्षण देणारे कायदे, सायबर क्राइम म्हणजे काय याची ही सविस्तर माहिती करून दिली.

या वेळी कॉलेजचे प्राचार्य पी. जी. पवार, उपप्राचार्य श्री महाले, प्रा. अमोल ठक्कर, तसेच इतर प्राध्यापक, शिक्षक व ६० विद्यार्थी उपस्थित होते.

## रोटरी क्लबतर्फे रिस येथे मोफत कृत्रिम अवयव वितरण शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा व रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण, एटीओएसच्या सीएसआर सहाय्याने रिस येथील गूड हेल्थ हॉस्पिटलमध्ये मोफत कृत्रिम पाय व हात वितरण शिबिराचे आयोजन करण्यात केले होते.

या वेळी तीन रुग्णांना कृत्रिम हात देण्यात आले, तसेच ५० रुग्ण (एक कृत्रिम पायासाठी) आणि पाच रुग्ण (दोन्ही पायांसाठी) या शिबिरामध्ये उपस्थित होते. अध्यक्ष रेश्मा सुनील कुरुप यांनी सांगितले की, आज गरजूवंतांचे पायांचे मोजमाप घेण्यात आले आणि १० सप्टेंबर रोजी त्यांना पुन्हा कॅम्पला बोलावून कृत्रिम पायांचे वितरण करणार आहोत. या प्रकल्पासाठी पाताळगंगाचे अध्यक्ष रेश्मा कुरूप, सचिव सुशांत उचिल, प्रोजेक्ट चेअरमन सुनील कुरूप, सर्व्हिस प्रोजेक्ट डायरेक्टर मेडिकल डॉ. मिलिंद भगत, सर्व्हिस प्रोजेक्ट डायरेक्टर नॉन मेडिकल गणेश काळे, रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याणचे अध्यक्ष कैलाश देशपांडे, प्रोजेक्ट चेअरमन पंकज झामरे, नामदेव चौधरी, सुखदा देशपांडे, शिला सबनीस, डॉ. लेख उचील, डॉ. धीरज जैन, दीपक चौधरी, गणेश म्हात्रे, सचिन थोरात, देवेंद्र महिंद्राकर, अमित शहा, शशिकांत शानभाग, गणेश मेणसे, संदीप साबळे, उमा मुंढे, शारदा काळे, वर्षा पाटील, प्रतीक्षा कुरंगळे, एंजल सुंदर, मेघा कोरडे, डॉ. सागर कांबळे, सुनील भोसले आणि भारती म्हात्रे, नेत्रा चौधरी, उषा मेणसे, डॉ. शितल भगत, डॉ. स्वीटी जैन, समृद्ध उचिल, रोट्रॅक्टरचे अध्यक्ष अनिकेत व इतर पाच रोट्रॅक्टर्स या प्रकल्पात सहभागी झाले होते.




## सीवूड्समध्ये रंगला खेळ खेळूया मंगळागौरीचा उत्सव

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

अश्विनी दत्ता घंगाळे अध्यक्ष राजमाता जिजाऊ महिला मंडळ आयोजित खेळ खेळूया मंगळागौरीचा कर्यक्रम सिवूड येथे शनिवारी (दि. २६) मोठ्या उत्साहात झाला.

सीवूडस् करावे नगर येथील महिलांसाठी मर्यादित असणाऱ्या स्पर्धेत विभागातील महिला संघांनी मंगळागौरीचे खेळ सादर केले. या वेळी प्राणा फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. प्राची नरेंद्र पाटील, राजमाता जिजाऊ महिला मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक दत्ता घंगाळे यांची प्रमुख उपस्थिती होती.



शिवदर्शन महिला ग्रुप, एकता महिला ग्रुप, कुसुमाग्रज वाचनालय महिला ग्रुप, यांनी अनुक्रमे प्रथम सात हजार रु. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, द्वितीय पाच हजार रु. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह, तृतीय पारितोषिक तीन हजार रु. प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह पटकावले, तर गुरुदत्त महिला ग्रुप, हिरकणी महिला ग्रुप, साईकृपा महिला ग्रुप, पोरी-पिंगा महिला ग्रुप आणि राजमाता जिजाऊ महिला ग्रुप यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. याशिवाय उपस्थित महिलांना लकी ड्रॉद्वारे पैठणीसह मेकअप किट अशी अनेक बक्षिसे वितरित करण्यात आली.

या स्पर्धेचे प्रमुख नियोजन पर्यवेक्षक म्हणून आशिमिक कामठे तसेच मिसेस रायगड आणि मिसेस नवी मुंबई किताब विजेती नृत्यदिग्दर्शिका अभिनेत्री आरती पानसरे यांनी काम पाहिले.

सीवूड्स कारावेनगर विभागात प्रथमच अशी मंगळागौर स्पर्धा आयोजित केली गेली होती. त्यांस मिळालेला प्रतिसाद पाहता पुढच्या वर्षीच्या मंगळागौर कार्यक्रमाची घोषणासुद्धा अश्विनी घंगाळे यांनी केली.




### श्रावणधारा

झरझर झरती श्रावण धारा
अंगणी आवारा
टपटप टपटप नाद करोनि
पडती जलधारा ।। धृ. ।।

टपटप पडता थेंब छतावर
भरभर धावत येती नागर
नाद मधुर तो ऐकून सारे
पाहती नभाम्बरा ।।१।।

ऊन पाऊस खेळ खेळती
नभांगणी या रंग फेकती
सप्त रंगाचा पट्टा येतो
अंबरी आकारा ।।२।।

वाहती नाले खळखळ करुनी
भरभर जाती सरीता भरुनी
धावत निघती प्रिया भेटण्या
आतुर समुंदरा ।। ३।।

कड्यावरुनी हे पाऊस पाणी
उड्या घेतसे धब धब करुनी
नादे रंगे रंगून गेला
आसमंत सारा ।।४।।

हिरवाईची लेवून वसने
भूमाता ही सजली भूषणे
नववधू परि नटली सजली
शोभे वसुंधरा ।।५।।

झाडे वेली खुशीत डुलती
पक्षी प्राणी मोदे विहरती
नयन मनोहर दृश्ये भूवरी
होती साकारा ।।६।।



- पां. गो. ठाकूर, उरण

## क्रॉस कंट्री स्पर्धेत महात्मा फुले महाविद्यालयाची ‘सुवर्ण’ कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाने मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या मुंबई झोन क्र. १च्या क्रॉस कंट्री स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई केली. मुलांच्या सुवर्णपदक विजेत्या संघाने या स्पर्धेची चॅम्पियनशिप मिळविली.

या संघामध्ये मनीष प्रकाश नाईक, स्वप्नील सुखदेव पडघन, प्रेम संतोष ठाकूर, प्रशांत मारुती शिंदे, सचिन अंबाजी वारघुडे व भानुप्रताप शिवशंकर यादव या विद्यार्थ्यांचा समावेश होता. महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा या स्पर्धेमुळे खोवला गेला. महाविद्यालयाच्या या पदकविजेत्या खेळाडूंपैकी मनीष प्रकाश



नाईक, स्वप्नील सुखदेव पडघन, हर्षदा अरविंद मोकल, प्रेम संतोष ठाकूर व प्रशांत मारुती शिंदे या पाच विद्यार्थ्यांची मुंबई विद्यापीठाच्या विभागीय संघात निवड झाली.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल प्रतिक्रिया देताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांनी असे सांगितले की, महाविद्यालयाने मागील शैक्षणिक वर्षात नॅकच्या चौथ्या मूल्यांकनाला रायगड जिल्ह्यातून प्रथम सामोरे जात ए प्लस मानांकन प्राप्त केले. आज क्रॉस कंट्री स्पर्धेत सुवर्णपदकाची कमाई करून चॅम्पियनशिपचे मानकरी ठरत विद्यार्थ्यांनी या मूल्यांकनाच्या दर्जावर शिक्कामोर्तब केले आहे. या आनंदाच्या प्रसंगी त्यांनी सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटीचे चेअरमन डॉ. प्रफुल्ल वशेणीकर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील, उपप्राचार्य डॉ. नरेश मढवी, आयक्यूएसी समन्वयक प्रा. सोपान गोवे, प्रा. प्रवीण गायकर व एनएसएनआयएस प्रशिक्षक अक्षय जितेकर व जिमखाना कमिटीतील सर्व सदस्यांनी मार्गदर्शन केले.

# चंद्रकांत कांबळे यांच्या हत्येच्या निषेधार्थ रोह्यात निदर्शने, जाळपोळ

## मारेकऱ्यांना त्वरित अटक करा; बहुजन क्रांती पँथरची मागणी

**रोहे : प्रतिनिधी**

कोकण रेल्वे मार्गावरील रोहा तालुक्यातील तिसे गेट येथे कामावर असलेल्या गेटमेन चंद्रकांत कांबळे यांची हत्या गोळी घालून अज्ञात मारेकरी यांनी केली होती. या हत्येचा निषेध व मारेकऱ्यांना त्वरित अटक करावी या मागणीसाठी सोमवारी (दि. २८) रोहा शहरातील जुने मच्छी मार्केट येथे बहुजन क्रांती पँथरच्या वतीने टायर जाळून निदर्शने करण्यात आली.


(छाया : महादेव सरसंबे)

बहुजन क्रांती पँथरचे अध्यक्ष राहुल सोळंकी यांच्या उपस्थितीत टायर जाळण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी चंद्रकांत कांबळे यांना न्याय मिळालेच पाहिजे अशा घोषणाही दिल्या. या वेळी काही काळ रोहा–कोलाड व रोहा–अष्टमी मार्गावर वाहतूक कोंडी झाली होती.

आंदोलनाची माहिती पोलिसांना मिळताच रोहा पोलीस घटनास्थळी त्वरित दाखल झाले. निरीक्षक प्रमोद बाबर व पथकाने निदर्शकांनी जाळलेले टायर रस्त्यातून बाजूला केले.

चंद्रकांत कांबळे यांची २१ ऑगस्ट रोजी तिसे रेल्वे गेटवर कामावर असताना हत्या झाली होती. हत्येनंतर रायगडचे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे–पाटील व तज्ज्ञ टीम घटनास्थळी पोहचली. पोलीस दलाच्या वतीने तपासासाठी आठ पथके नेमण्यात आली आहेत, पण अद्याप या हत्येचा तपास लागला नसल्याने बहुजन समाज व आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत.

बहुजन क्रांती पँथरच्या वतीने जुना मच्छी मार्केट येथे केलेल्या आंदोलनात पँथर आर्मी प्रदेश अध्यक्ष सुशील जाधव, कर्जत तालुका युवा अध्यक्ष रोहित जाधव, जिल्हा अध्यक्ष रोशन मोरे, युवा अध्यक्ष अमित केदारे, उत्तम शिंदे आदी उपस्थित होते.

# वळके येथील शेकाप, राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील वळके विभागात शिवसेनेने जोरदार मुसंडी मारली असून वळके ग्रामस्थ, शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. अलिबाग चाळमळा येथील निवासस्थान कार्यालयात आमदार महेंद्र दळवी यांनी पक्षप्रवेशकर्त्यांचे स्वागत केले.


(छाया : महेंद्र खैरे)

या कार्यक्रमास शिवसेना उपजिल्हाप्रमुख भरत बेलोसे, जिल्हा नियोजन समिती सदस्य निलेश घाटवळ, जेष्ठ नेते सी. एम. ठाकूर, जिल्हा महिला आघाडी प्रमुख शुभांगी करडे, उपतालुकाप्रमुख भगिरथ पाटील, विभागप्रमुख सुनील दिवेकर, मोहन ठाकूर, मधुशेठ पाटील, सुरेश ठाकूर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी वळके सुधीर सावंत, ग्रामपंचायत सदस्य गीता सावंत, किशोर भगत, चंद्रकला भगत, रंजना म्हात्रे, संचिता म्हात्रे, मंजुळा म्हात्रे, प्रियांका सावंत, वैशाली भगत, नर्मदा म्हात्रे, अंजली म्हात्रे, राजेश्री धनावडे, प्रणाली सावंत, वस्तला भगत, राजेश्री भगत, सपना काटकर, सरिता भगत, हिरा सावंत, दत्ता मध्ये, पद्माकर वाजंत्री, कौशल्य सावंत, श्रीधर भगत, श्रीकांत म्हात्रे, सहदेव म्हात्रे, मंगेश सावंत, सुभाष सावंत, अनंता भगत, जनार्दन धनावडे, हरिश्चंद्र म्हात्रे, राजेंद्र म्हात्रे, परशुराम म्हात्रे, सचिन म्हात्रे, चंद्रकांत भगत, जगन्नाथ म्हात्रे, शनिता धनावडे, आदींनी शिवसेनेत पक्षप्रवेश केला.

पक्षप्रवेश केलेल्या वळके परिसरातील ग्रामस्थ व कार्यकर्ते यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. वळके विभागात विकासकामांचा झंझावात सुरू राहील, असे आमदार महेंद्र दळवी यांनी सांगितले.

वळके ग्रामपंचायत हद्दीत शिवसेनेचे वर्चस्व वाढले असून आगामी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व विधानसभा निवडणुकीत मोठे मताधिक्य शिवसेनेला येथून मिळेल, असा विश्वास ज्येष्ठ नेते सी. एम. ठाकूर यांनी व्यक्त केला.

# दिव्यांगांच्या दारी अभियान पूर्वतयारीचा डॉ. भरत बास्टेवाड यांनी घेतला आढावा



**अलिबाग : प्रतिनिधी**

दिव्यांग कल्याण विभाग दिव्यांगांच्या दारी अभियानातर्गत मंगळवारी (दि. २९) पनवेल येथील विरुपाक्ष मंगल कार्यालयात जिल्हास्तरीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी मेळाव्याच्या प्रत्यक्ष कार्यक्रमस्थळी भेट देऊन पूर्वतयारीची पाहाणी केली आणि आढावा घेतला.

या मेळाव्याच्या पूर्वतयारीबाबत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी पनवेल पंचायत समिती येथे आढावा बैठक घेतली. या बैठकीस जिल्हा परिषद समाजकल्याण अधिकारी डॉ. शामराव कदम, पनवेलमहापालिकेचे अतिरिक्त आयुक्त श्री. राठोड, गटविकास अधिकारी संजय भोये तसेच पंचायत समितीचे सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. या मेळाव्याचे नियोजन व कार्यवाहीसाठी विविध १० समित्या स्थापन करण्यात आल्या असून येथे १८ स्टॉल्स उभारण्यात येत आहेत. डॉ. बास्टेवाड यांनी या कामाचा व समित्यांच्या कामकाजाचा आढावा घेतला.

जिल्हाधिकारी कार्यालय रायगड, जिल्हा परिषद रायगड आणि पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. दिव्यांग अभियानाचे मुख्य मार्गदर्शक आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू हे उपस्थित राहणार आहेत.

# माथेरानमध्ये पालिकेतर्फे स्वच्छता अभियान

**माथेरान : रामप्रहर वृत्त**

रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सातत्याने मोहीम राबवून स्वच्छतेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे निर्देश जिल्ह्यातील सर्व नगर परिषदांना दिले आहेत. त्या अनुषंगाने जिल्ह्यात विविध ठिकाणांबरोबरच माथेरानमध्येही स्वच्छता अभियान राबविण्यात आले.



मुख्याधिकारी वैभव गारवे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान शहर स्वच्छ, सुंदर ठेवण्यासाठी स्वच्छता अभियान झाले. या वेळी अहिल्याबाई होळकर चौक, इंदिरा गांधीनगर तसेच इतरही ठिकाणचा कचरा उचलण्यात आला. यात रस्त्यात पडलेली झाडे, गटारात पडलेल्या बाटल्या काढून साफसफाई करण्यात आली. एकूण एक टन कचरा सुमारे ८० कर्मचारीवर्गाच्या साह्याने उचलून शहर स्वच्छ करण्यात आले.

या स्वच्छता अभियानात नगर परिषदेचे अधिकारी स्वछता निरीक्षक नरेंद्र सावंत, कार्यालयीन अधीक्षक अंकुश ईचके, अभियंता अभिमन्यू येळवंडे, वरिष्ठ लिपिक प्रवीण सुर्वे, कर विभाग प्रमुख सदानंद इंगळे, अजय साळुंखे, जयवंत वर्तक, ज्ञानेश्वर सदगीर यांच्यासह कामगारवर्ग सहभागी झाला होता.

# गणेशोत्सवासाठी माणगाव आगार सज्ज

■ मुंबईसह ग्रामीण भागात धावणार 'लाल परी'

**माणगाव : प्रतिनिधी**

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असताना प्रवासीवर्गातील गणेशभक्तांची आपल्या गावाकडील ओढ लक्षात घेता माणगाव एसटी आगाराने बसगाड्यांचे विशेष नियोजन केले आहे. मुंबईसह ग्रामीण भागात लाल परीच्या विशेष फेऱ्या होणार असून आतापर्यंत २७ बसगाड्यांचे आगाऊ आरक्षण फुल झाले आहे.



माणगाव बस आगारात ३६ बस गाड्या आहेत. यंदा मुंबईतून प्रवाशांना सोडण्यासाठी जादा विशेष गाड्या सोडून प्रवाशांची सोय गणेशोत्सव काळात केली जाणार आहे. गणेशभक्तांच्या परतीच्या प्रवासासाठी मुंबईकडे प्रवाशांना सोडण्याची माणगाव बस आगारावर जबाबदारी दिली आहे. त्यामुळे सुरत, मुंबई, ठाणे, नालासोपारा, बोरीवली, कल्याण, भिवंडी यासह अनेक भागांत लाल परी प्रवाशांच्या सेवेत धावणार आहेत.

माणगाव तालुक्यातील व आजुबाजूच्या तालुक्यातील नागरिक मोठ्या प्रमाणात विविध कामानिमित्त मुंबई, सुरत भागात आहेत. वर्षातून एकदा येणाऱ्या लाडक्या गणरायाच्या दर्शनाला तो गावी कुटुंबासह येत असतो. या आगारातून सुटणाऱ्या बस या अपुऱ्या असल्या तरी माणगाव आगाराने उत्पन्नाचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी उपलब्ध बस गाड्यांनुसार पाऊल उचलले आहे.

माणगाव आगाराकडे असणाऱ्या उपलब्ध बसगाड्यांपैकी काही लांब पल्ल्याच्या प्रवासासाठी चालू आहेत, तर शालेय विद्यार्थ्यांसाठी चालू असणाऱ्या बसगाड्या या शाळेला सुटी असल्याने गणेशोत्सवासाठी वापरण्यात येणार आहेत. मुंबईतून प्रवासी नागरिक मोठ्या प्रमाणात गावी येत असल्याने त्याची गैरसोय होऊ नये यासाठी ही बससेवा तत्पर असणार आहे. त्यासाठी मुंबईतून येणाऱ्या गणेशभक्तांची गर्दी व गरज लक्षात घेता माणगाव आगाराने या फेऱ्या वाढविण्याचे नियोजन केले आहे.

# जयपाल पाटील यांची नियुक्ती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी व आपत्ती व्यवस्थापन तज्ज्ञ रायगडभूषण जयपाल पाटील यांना अमरावतीच्या छत्रपती शिवाजी महाराज लोक विद्यापीठाने संचालकपदी नियुक्ती केली आहे. याबाबतचे पत्र कुलसचिव प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे व महासंचालक डॉ. मंगेश देशमुख यांनी पाटील यांना पाठविले आहे.

जयपाल पाटील आंबा, नारळ, भाजीपाला उत्पादक असून ते अधिक उत्पादनाचे प्रयोग सातत्याने करतात. मुंबई आकाशवाणी कृषी कार्यक्रम समिती सल्लागार म्हणून काम पाहतात तसेच ते आपत्ती सुरक्षेचे धडे देत आहेत.



**मुरूड : संजिवनी आरोग्य संस्थेतर्फे आधारस्तंभ डॉ. सनाउल्लाह घरटकर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी रुग्णवाहिका समिती अध्यक्ष रशीद फहीम, चंद्रकांत अपराध, नितीन अंबुर्ले, किर्ती शहा, विजय सुर्वे, अजित गुरव, अमित कवळे, अविनाश दांडेकर, आदेश दांडेकर, वासंती उमरोटकर आदी उपस्थित होते.** (छाया : सुधीर नाझरे)

# इर्शाळवाडीतील सेवेबद्दल बांधकाम खात्याचे कर्जत विभाग उपअभियंता, कर्मचाऱ्यांचा सत्कार



**कर्जत : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी येथे दरड कोसळल्यानंतर शासनाच्या सर्वच विभागांच्या माध्यमातून मदतकार्य सुरू होते.त्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कर्जत उपविभागाने केलेल्या कामगिरीची राज्य शासनाने नोंद घेतली आहे. उपअभियंता तसेच शाखा अभियंता यांना प्रमाणपत्र देऊन शासनाच्या वतीने गौरविण्यात आले. त्याबद्दल या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांचा कर्जत ठेकेदार संघटनेने सत्कार केला.

इर्शाळवाडीत १९ जुलैला रात्री दरड कोसळली होती. शासनाच्या विविध विभागांच्या माध्यमातून आणि प्रयत्नाने दरडग्रस्तांसाठी आठ दिवसांत चौक येथे तात्पुरते पुनर्वसन करताना आवश्यक असलेले कंटेनर रूम उपलब्ध करण्यात आले. तेथील जमिनीचे काँक्रीटीकरण करून कंटेनर उभे करण्यात आले होते.त्यानंतर त्या कंटेनरमध्ये प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्यात बांधकाम विभागाने महत्त्वाची कामगिरी बजावली. त्यात स्थानिक पुनर्वसनस्थळी रस्ते, शौचालय, बाथरूम, नळ पाणीपुरवठा आणि अंघोळीसाठी गरम पाण्याचे गिझर याची व्यवस्था करण्यात आली. यामध्ये सहभाग घेणारे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता संजीव वानखेडे यांचे कौतुक रायगड मंडळाच्या अधीक्षक अभियंता सुषमा गायकवाड यांनी केले आहे.

उपअभियंता वानखेडे यांच्यासह अभियंता अक्षय चौधरी, रोहित थोरात, मोहन पाटील, कर्मचारी अजय पवार, जनार्दन खंडागळे यांना सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनीदेखील वानखेडे यांना सन्मानपत्र दिले. याबद्दल कर्जत तालुका ठेकेदार संघटनेच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी, कर्मचारी यांचा सन्मान करण्यात आला. शिवसेना उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष संतोष भोईर, रिपाइं नेते व माजी उपनगराध्यक्ष राहुल डाळिंबकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# पत्रकारांच्या मागण्यांसाठी खालापूर तहसीलदारांना निवेदन


(छाया : अरुण नलावडे)

**खालापूर : प्रतिनिधी**

नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी लढणाऱ्या पत्रकारांच्या मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात यावा यासाठी व्हाईस ऑफ मीडियाचे अध्यक्ष संदीप काळे व उपाध्यक्ष फिरोज पिंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि. २८) व्हाईस ऑफ मीडिया संघटनेकडून संपूर्ण राज्यात निवेदन देण्यात आली. या अंतर्गत खालापूर तहसीलदारांनाही निवेदन सादर करण्यात आले.

ज्या पत्रकारांना पत्रकारितेमध्ये दहा वर्षे पूर्ण झाली आहेत अशा पत्रकारांना अधिस्विकृती कार्ड देण्यात यावे, राज्याच्या माहिती महासंचालनालयाने शासनाचे पोर्टल तयार करून त्या पोर्टलवर नव्याने पत्रकारितेत पदवी पूर्ण करून किमान तीन महिने पत्रकारितेचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे अशा पत्रकारांना प्रमाणपत्र देण्यात यावे, पत्रकारांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे, राज्यातील सर्व वर्तमानपत्र, साप्ताहिके, मासिक यांना जाहिराती देण्यात याव्यात, माहिती महासंचालनालयाच्या वतीने सकारात्मक पत्रकारितेला प्रोत्साहित करणारे पुरस्कार देण्यात यावे, टीव्ही, रेडियो आणि सोशल मीडियात काम करणाऱ्या पत्रकारांना श्रमिक पत्रकार म्हणून मंत्रिमंडळाने घोषणा केली आहे या दोन विषयांचा तत्काळ जीआर काढण्यात यावा, अधिस्वीकृती कार्ड आणि सेवानिवृत्ती नंतर देण्यात येणारे मानधन याबाबत असणाऱ्या जाचक अटी रद्द करण्यात याव्यात व त्याबाबत कमिटी नेमून ज्यांचे प्रस्ताव रखडले आहेत ते मार्गी लावावेत, सोशल मीडिया पत्रकारितेसाठी तातडीने जाहिरातीबाबत पॉलिसी बनवावी, पत्रकार व त्यांच्या कुटुंबायांना विमा सुरक्षा कवच देण्यासंबंधीच्या सूचना प्रत्येक नोंदणी असलेल्या माध्यमांना देण्यात याव्यात, सरकार आणि राज्य कामगार विभाग यांना या सूचनांचे पालन काटेकोर करण्याबाबत मार्गदर्शिका द्यावी, पत्रकारांच्या सेवानिवृत्तीनंतर देण्यात येणारे मानधन २० हजार रुपये करू अशी घोषणा केली गेली आहे त्या घोषणेची अंमलबजावणी करण्यात यावी, अशा मागण्या आहेत.

निवेदन देतेवेळी व्हाईस ऑफ मीडिया जिल्हाध्यक्ष हेमलता चिंबुलकर, तालुका अध्यक्ष दीपक जगताप, कार्याध्यक्ष संतोष मोरे, महिला तालुका अध्यक्ष किशोरी चेउलकर, डिजिटल मीडिया तालुका अध्यक्ष जितेंद्र भोईर, खोपोली शहर अध्यक्ष किशोर साळुंखे, सचिन यादव आदी उपस्थित होते.

